दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादकः बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य — संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | मंगळवार,दि.५ नोव्हेंबर २०२४ | वर्षे४रे | अंक८९वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

जिल्ह्यात विधानसभा निवडणूकीचे वातावरण चांगलेच तापले आहे. खरंतर सहाही मतदार संघात वेगवेगळे चित्र आहे. त्यामुळे कोणाचा पत्ता कधी कट होईल याचाही नेम नाही. परिणामी १९६२ पासून सत्तेत ठाण मांडून बसलेल्या लोकांना जनता, यंदा घरचा रस्ता दाखविण्याच्या तयारीत आहे.त्यामुळे प्रस्थापित घराण्यांचे धाबे दणाणले आहेत.गेवराई मतदार संघात मनसे उमेदवार मयुरी बाळासाहेब मस्के-खेडकरांचे काम अतिशय दखलपात्र असल्याने जनता त्यांच्या बाजूने उभा राहिली तर, त्या नक्कीच गेवराईच्या आमदार होतील आणि एक इतिहास घडेल. असे चित्र गेवराई मतदार संघात दिसून येत आहे.



गेवराई करांनो तुम्ही ठरविले तर, आमदार नक्कीच महिला असेल!

यंदा बदल निश्चित, मनसेचे इंजिन परिवर्तन घडवून आणेल

१९६२ पासून पंडित-पवार, अजून किती दिवस त्यांना निवडून देणार?

# गेवराईची जनता यंदा इतिहास घडवेल!

## टॅलेंट अन् निडर मयुरी बाळासाहेब मस्के-खेडकरांचे पारडे जड

### मी गरीब शेतकऱ्याची मुलगी

गेवराईत आत्तापर्यंत पंडित-पवार या प्रस्थापितांची मक्तेदारी राहिलेली आहे. मात्र त्यांनी केवळ स्वतःच्या संस्था वाढविण्याशिवाय दुसरे काही काम केले नाही. त्यामुळे आजही एमआयडीसी नाही, शासकीय इंजिनिअरिंगसह इतर कॉलेज नाहीत.तसेच, शेतकरी व बेरोजगारी प्रश्न ऐरणीवर आहे.त्यामुळे जनता प्रस्थापितांना कंटाळली असून यावेळी मतदार संघातील सुज्ञ मतदार हा मयुरी मस्के या शेतकऱ्याच्या मुलीला विधानसभेत पाठवेल. हा विश्वास असल्याचे मनसेच्या उमेदवार मयुरी बाळासाहेब मस्के यांनी माध्यमांशी संवाद साधत असताना व्यक्त केला.





### बाळासाहेब मस्केंनी पुण्याई कमविली

**५०७३** नागरिकांचे मोफत मोतिबिंदू ऑपरेशन

**३३३७** मनुरांच्या कुटुंबाला कोरोनात आधार दिला

**१६६५** महिलांना मोफत देवदर्शन घडवून आणले

**३९१५** भाविक-भक्तांना शिर्डी देवदर्शन

### आलटून-पालटून एकच घराणे

| उमेदवार | पक्ष | सन | मिळालेली मते |
|---|---|---|---|
| सयाजी त्रिंबक पंडित | काँग्रेस | १९६२ | ३४०८ |
| शाहूराव पवार | सिपीआय | १९६७ | २३३७६ |
| सुंदरराव सोळंके | काँग्रेस | १९७२ | बिनविरोध |
| शिवाजीराव पंडित | काँग्रेस | १९७८ | ३८५३९ |
| माधवराव पवार | काँग्रेस यु | १९८० | ३४७९८ |
| शिवाजीराव पंडित | आयसीपी | १९८५ | ४७८४४ |
| शिवाजीराव पंडित | काँग्रेस | १९९० | ६७७७० |
| बदमराव पंडित | अपक्ष | १९९५ | ७१६६२ |
| बदमराव पंडित | अपक्ष | १९९९ | ६८९३७ |
| अमरसिंह पंडित | भाजप | २००४ | ८०४१४ |
| बदमराव पंडित | राष्ट्रवादी | २००९ | १००८१६ |
| लक्ष्मण पवार | भाजप | २०१४ | १३६३८४ |
| लक्ष्मण पवार | भाजप | २०१९ | ९९६२५ |

## गेवराईत मयुरी बाळासाहेब मस्के-खेडकरांचे प्रचंड मोठे कार्य

## खंजर बाळगणाऱ्यास पकडले
### मोहीम:बीड शहर पोलिसांची कारवाई

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

आगामी विधानसभा निवडणूक पार्श्वभूमीवर बीड शहर पोलिसांनी गुन्हेगारां विरुद्ध मोहीम हाती घेतली असून या मोहिमेअंतर्गतच आज त्यांनी सोबत दोन खंजर बाळगण्यास अटक केली आहे. आज खात्रीशीर माहिती मिळाली होती की तकीया मस्जिद भागात अभिलेखावरील गुन्हेगार फिरोजखान हारूणखान पठाण, राहणार तकिया मज्जित जवळ, बीड. हातात खंजर घेऊन फिरत आहे आणि त्याच्या जवळ दोन खंजर आहेत. त्यामुळे त्या भागामध्ये




दहशत पसरली आहे.अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने त्या ठिकाणी तात्काळ पोलीस टीम रवाना करण्यात पान २ वर...

## गस्त पथकाने एक लाख पकडले!
### मोहिम: समाधानकारक कारण न दिल्याने कारवाई

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदार संघामध्ये ०३.११.२०२४ रोजी रात्री १.३० च्या दरम्यान एफएसटी (गस्ती) पथकाच्या तपासणी दरम्यान शिवराज पान सेंटर जवळ गाडी क्र. चक १२ ऋध ७९९४ (स्विफ्ट कार) मध्ये रु १.०० लक्ष रुपयांची रक्कम आढळून आली. संबंधित गाडीचालक यांना सदरील रक्कमेबाबत समाधानकारक खुलासा सादर करता आला नाही. त्यामुळे सदरील पान २ वर...

## जरांगे पाटलांच्या भूमिकेनंतर पोष्ट झळकली
### संभाजी सुर्वे : कोणी कुठेही जावे,आपण भाजपमध्येच राहणार

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

सध्या राज्यभर विधानसभा निवडणुकीचे वातावरण असल्याने सर्व महाराष्ट्राचे जरांगे पाटील यांच्या भुमिकाकडे लागले होते. अशात त्यांनी निवडणूक लढवणार नसल्याचे जाहीर केले. त्या नंतर भाजपाचे संभाजी सुर्वे यांनी आपल्या सोशल मीडियावर एक बाँडची पोष्ट केली आहे. या मध्ये त्यांनी लिहिले आहे की, आळंदी ते पंढरपूर पालखी महामार्गाची






संकल्पना, पंढरपूर मध्ये वारकरी भवन बांधकाम संकल्पना, समृध्दी महामार्ग नागपूर ते मुंबई संकल्पना, शक्तीपीठ महामार्गाची संकल्पना, जलयुक्त शिवार संकल्पना, गावागावात शेत तळी संकल्पना, महाराष्ट्रातील मेट्रो रेल प्रकल्पाचे शिल्पकार, मुंबई मधील सी लिंक रोड, अटल सेतू, कोस्टल रोड, लाडकी बहीण, लाडका भाऊ, शेतकऱ्यांना मोफत वीज पुरवठा या सर्व पान २ वर...

**चर्चेतले** सांगितली तीन कारणं, कुणावर फोडलं खापर?

# मनोज जरांगेंची निवडणूकीतून माघार!!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत मोठा ट्वीस्ट पाहायला मिळत आहे. मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी निवडणूक लढवण्याची घोषणा केली होती. मात्र २४ तास उलटण्यापूर्वी मनोज जरांगे पाटील यांनी मोठी घोषणा केली आहे. मनोज जरांगे पाटील यांनी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला. काल सकाळी पत्रकार परिषद घेत त्यांनी ही घोषणा केली. आता निवडणूक लढणार नाही, पण उमेदवार पाडणार असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे. यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी निवडणूक न लढवण्यामागील कारणंही सांगितले आहेत.

मनोज जरांगे पाटील यांनी सकाळी पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत मनोज जरांगे पाटील यांनी निवडणुकीतून माघार



घेत असल्याचे स्पष्ट केले. यावेळी त्यांनी निवडणुकीतून माघार घेण्यामागचे कारणही सांगितले आहे. पान २ वर...

### मनोज जरांगेंनी 'या' तीन कारणांनी घेतली माघार

आमची मध्यरात्री ३ वाजेपर्यंत चर्चा सुरु होती. आम्ही १४ उमेदवार निश्चित केले होते. मात्र इतर समाजाकडून उमेदवारांची यादी जाहीर झाली नाही. मध्यरात्री उशिरापर्यंत त्यांच्याकडून कोणतीही यादी आलेली नाही. मित्रपक्षांनी उमेदवारांची नावं न पाठवल्याने उमेदवार घोषित केले नाही. आम्हाला एकाच जातीच्या आधारावर लढणं शक्य नाही. मराठा समाजाचे उमेदवार एका जातीवर निवडून येऊ शकत नाही. एकाच जातीवर निवडणूक जिंकणे सोपं नाही, असे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले.

**कोणाला पाठिंबा देणार नाही :** विधानसभा निवडणुकीतून आम्ही माघार घेतलेली नाही. हा गनिमी कावा आहे. त्यामुळे समाज बांधवांनी आपापले अर्ज मागे घ्यावेत. महाविकासआघाडी असो किंवा महायुती असो, दोन्हीकडचे नेते सारखेच आहेत. त्यामुळे कोणाला पाठिंबा देणार नाही. तसेच कोणालाही निवडून आणा, असे देखील सांगणार नाही. आपण कुणाच्याही प्रचाराला, सभेला जायचं नाही, मतदान करायचं आणि मोकळ व्हायचं. गुपचिप जायचं, मतदान करायचं आणि पडायचं म्हणत नाही. केवळ माझे आंदोलन सुरु राहणार असेही मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले.

## ट्रम्पच्या विजयासाठी भारतात होमहवन
### देशविदेश: दिल्लीत धर्मगुरुंनी केली प्रार्थना!



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

दिल्लीतील हिंदू धर्मगुरूंच्या एका गटाने ३ नोव्हेंबर रोजी डोनाल्ड ट्रम्प यांच्यासाठी होम हवन आणि प्रार्थना केली. डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेतील राष्ट्राध्यक्ष निवडणुकीच्या रिंगणात आहेत. ५ नोव्हेंबर रोजी येथे मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.डोनाल्ड ट्रम्प हे एकमेव नेते आहेत जे जागतिक शांतता प्रास्थापित करू शकतात, असं हिंदू धर्मगुरू स्वामी वेदमुर्तीनंद सरवस्वती यांनी सांगितलं. डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर जुलै महिन्यात प्राणघातक हल्ला झाला होता. तेव्हावी वेदमुर्तीनंद यांनी डोनाल्ड ट्रम्प यांच्यासाठी प्रार्थना केली होती. अमेरिकेत राहणेर भारतीय आणि जगभरातील हिंदूंचे रक्षण करण्याचं पान २ वर...

## सुज्ञ की सैतान?

साऱ्या विवेकी जगाच्या हृदयाची धाकधूक वाढवणारी घटना या आठवड्यात घडेल. ती म्हणजे अमेरिकेची अध्यक्षीय निवडणूक. या जागतिक धाकधुकीचे भवितव्य तेथील जनतेने रिपब्लिकन पक्षाचे डोनाल्ड ट्रम्प वा डेमॉक्रॅटिक पक्षाच्या कमला हॅरिस यांच्यापैकी कोणास कौल दिला या प्रश्नाच्या उत्तरावर अवलंबून असेल. म्हणजे ही धाकधूक थांबणार की पुढील चार वर्षांसाठी उत्तरोत्तर वाढणार हे या निवडणुकीत स्पष्ट होईल. त्या देशाच्या रीतीप्रमाणे पहिल्या नोव्हेंबरातील पहिल्या सोमवारनंतरच्या मंगळवारी ५ नोव्हेंबरला या निवडणुकीत अमेरिकेचा अध्यक्ष निवडला जाणार असला तरी तांत्रिक अर्थाने ही अध्यक्षीय निवडणूक म्हणता येत नाही. कारण विविध राज्यांत विखुरलेली अमेरिकी जनता प्रत्यक्षात राजकीय पक्षास मत देत असते. म्हणजे डेमॉक्रॅटिक वा रिपब्लिकन या पक्षांस मते दिली जातात आणि त्यातून ५३८ लोकप्रतिनिधी निवडले जातात. त्यातील किमान २७० लोकप्रतिनिधी ज्या पक्षाचे निवडून येतात त्या पक्षाचे लोकप्रतिनिधी राज्याराज्यांच्या राजधानीत डिसेंबरातील दुसऱ्या बुधवारनंतरच्या मंगळवारी एकत्र येतात आणि त्या बैठकीत अध्यक्ष, उपाध्यक्ष निवडले जातात. म्हणजे ही थेट अध्यक्षीय निवडणूक नाही. यातही परत मेख अशी की एखाद्या पक्षाचे एखाद्या राज्यात निम्म्यापेक्षा अधिक लोकप्रतिनिधी निवडून आले तर त्या राज्याची शंभर टक्के मते त्या त्या पक्षाच्या पारड्यात घातली जातात. अमेरिकेत एखादे राज्य 'लाल' की 'निळे' असे म्हटले जाते ते यामुळे. लाल रंग हा रिपब्लिकनांचा तर निळा डेमॉक्रॅट्सचा. या निश्चित रंगलेल्या राज्यांखेरीज खरी लढाई असते ती 'लाल' की 'निळे' हे ठरवता येत नाही, अशा राज्यांत. त्यांना स्विंग स्टेट्स म्हणतात. म्हणजे ही राज्ये रिपब्लिकनांची तळी उचलणार की डेमॉक्रॅट्सना पाठिंबा देणार यावर बऱ्याचदा अध्यक्षपदी कोण विजयी होईल, हे ठरते. अमेरिकेच्या निवडणूक प्रक्रियेविषयीची ही किमान आवश्यक तांत्रिक माहिती. आता तेथे सध्या सुरू असलेल्या अध्यक्षीय निवड प्रक्रियेतील राजकारणाविषयी.

आपल्याकडची परिस्थिती बरीच बरी असे वाटावे असे सध्याचे अमेरिकेतील राजकारण. ते पाहिल्यावर हीच का ती जगातील महासत्ता असा प्रश्न पडावा आणि इतक्या बिनडोक मुद्द्यांवर तेथे राजकारण होत असेल तर या विश्वाचीच काळजी वाटावी. गेले काही महिने त्या देशातील प्रचार पाहिल्यास हा देश म्हणजे भौतिकदृष्ट्या अत्यंत प्रगत आणि बौद्धिक/मानसिकदृष्ट्या आदिम जनांचा समूह वाटू लागतो. यंदा अमेरिकेत कोणता मुद्दा सर्वाधिक 'चालला' असेल तर तो आहे 'सैतान' (सेटन). तो 'यशस्वीपणे' चालवण्याचे श्रेय(?) अर्थातच ट्रम्पबाबांचे. डेमॉक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार कमला हॅरिस या निपुत्रिक आहेत, या पक्षाचे समर्थक हे मुख्यत: स्थलांतरित आहेत, त्यांचे अमेरिकेवर प्रेम नाही, ही सारी 'सैतान' समर्थकांची अवलाद, त्यांना रोखण्याची हिंमत एकच एक ट्रम्प यांच्यात आहे हे या कथानकातील लक्षणीय मुद्दे. ते अर्थातच रिपब्लिकनांनी रंगवले आणि त्यांच्या वतीने विविध लहानमोठ्या धर्मगुरूंनी प्रचारसभांतून जनमनात रुजवले. ट्रम्प यांच्या रिपब्लिकन पक्षाचे समर्थक तसेही धर्मभोळे, अंधश्रद्धांनी ओतप्रोत भरलेले, आधुनिकतेपासून मैलोगणती दूर, म्हणूनच स्त्रियांचा गर्भपाताचा हक्क नाकारणारे इत्यादी अवगुणवैशिष्ट्यांनी भरलेले असतात. त्यांच्या हलक्या मेंदूंत ही सैतान-कथा खरोखरच रुजली. त्याचमुळे हे स्थलांतरित अमेरिकी नागरिकांचे पाळीव कुत्रे मारून खाऊ लागले आहेत ही ट्रम्पकढी देशभर चर्चेचा विषय ठरली. वास्तविक जेथे असे प्रकार घडल्याचे ट्रम्प यांनी बेधडकपणे सांगितले तेथील स्थानिक पोलिसांपासून प्रशासनापर्यंत अनेकांनी हे असे काही घडल्याचा अधिकृतपणे इन्कार केला. पण तरी ट्रम्प यांनी काही आपला हेका सोडला नाही.तूर्त जनमत चाचण्यांनुसार हा धोका ५० टक्के इतका आहे. म्हणजे इतके सारे रामायण रचूनही ट्रम्प यांची आघाडी ५० टक्क्यांवर जाताना दिसत नाही. ती तशी जाऊ नये, अशीच अपेक्षा सुज्ञांस असेल. बहुमत सुज्ञांचे की सैतानकथांचे याचे उत्तर या आठवड्यात मिळेल.

# ...राजकीय पक्ष समजून घेण्यासाठी

## डॉ.शशिकांत पट्टेकर:फुले आंबेडकरी समूहाकडून अभ्यास वर्ग

माजलगाव/पुण्यभूमी प्रतिनिधी

राजकीय पक्ष समजून घेण्यासाठी त्या पक्षांची उत्पत्ती मूळ, धोरणे आणि उद्देश समजून घेणे गरजेचे आहे असे प्रतिपादन डॉ.शशिकांत पट्टेकर यांनी केले ते माजलगाव येथेफुले आंबेडकरी अभ्यास समूहाच्या वतीने आयोजित एक दिवसीय विशेष अभ्यास वर्गात बोलत होते. या अभ्यास वर्गाचा विषय भारतातील ब्राह्मणवादी राजकीय पक्षांची उत्क्रांती: त्यांची धोरणे, उत्पत्ती-मुळ आणि उद्देश हा होता.

सविस्तर माहिती अशी की, दि २७ ऑक्टोबर २०२४ रोजी या विशेष या अभ्यास वर्गाचे उद्धाटन डॉ. अजय ओव्हाळ,लातूर यांनी केले तर या कार्यक्रमाचे उद्बोधन फुले-आंबेडकरी अभ्यास समूहाचे संयोजक डॉ.शशिकांत पट्टेकर यांनी केले.कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांना अभिवादन करून झाली.

या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना डॉ.शशिकांत पट्टेकर यांनी सांगितले की, भारतीय समाजव्यवस्था ही ब्राह्मणवादावर आधारित आहे.आजचे राष्ट्रीय स्तरावरील राजकीय पक्ष हे ब्राह्मणवादी आहेत. हे समजावून सांगत असताना त्यांनी सांगितले की या सर्व पक्षांची धोरणे,त्यांची उत्पत्ती-मुळ आणि त्यांचे उद्देश एकच आहेत.या ब्राह्मणवादी पक्षांचे धोरणे ही बहुजनांच्या विरोधामध्ये आहेत.डॉ.पट्टेकर यांनी त्यांची उत्पत्ती- मूळ सांगत असताना सांगितले की या सर्व ब्राह्मणवादी राजकीय पक्षांची निर्मिती ब्राह्मणांनी केली.कॉंग्रेसची स्थापना ब्राह्मणांनी केली.तसेच बीजेपी ज्या आरएसएसमधून निर्माण झाली.त्या आरएसएस ची निर्मिती ब्राह्मणांनी केली.आजही आरएसएस आणि बीजेपी मध्ये ब्राह्मण






आहेत.कम्युनिस्ट पार्टीच्या निर्मितीमध्ये देखील ब्राह्मण आहेत.त्यामुळे सर्व पक्षांची उत्पत्ती-मुळामध्ये ब्राह्मण आहेत.या ब्राह्मणवादी राजकीय पक्षांचा उद्देश एकच आहे, ती आरक्षण विरोधी देखील आहेत हे स्पष्ट करत असताना डॉ.शशिकांत पट्टेकर यांनी सांगितले की कॉंग्रेस आणि बीजेपीचा उद्देश एकच आहे. कॉंग्रेस आणि बीजेपी असे म्हणते की आम्हाला राम राज्य आणायचे आहे. हे पक्ष चुकूनही कृष्ण राज्य आणायचे आहे असे का म्हणत नाहीत? हा प्रश्न डॉ.पट्टेकर यांनी उपस्थित केला.याचे उत्तर देत असताना त्यांनी सांगितले की याचे कारण की राम हा जन्माने ब्राह्मण होता व कृष्ण हा जन्माने अब्राह्मण होता म्हणजेच याचा अर्थ रामाचे राज्य आणणे म्हणजे ब्राह्मणांचे राज्य आणणे.या कार्यक्रमास इंजि. भगवान साकसमुद्रे, श्रीकांत इंगळे, प्रदीप चव्हाण, ड. निसर्गन, चेअरमन निशांत साळवे यांच्यासह महिला, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंजि.मनोज कांबळे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रशांत मस्के यांनी केले.

## पान एक वरून

**गेवराईची जनता यंदा**

राज्यात सार्वत्रिक विधानसभा निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेला आहे. निवडणूकपूर्वीच प्रत्येक पक्षात उलथापालथ झाली असल्याने अनेकजण दुखावले गेले आहेत. त्यामुळे सहाजिक निवडणूक रिंगणात अनेक उमेदवार नशीब आजमावत असल्याचे दिसते.निवडणूक लढविणे हा ज्याचा त्याचा वैयक्तिक अधिकार आहे. मात्र मतदार संघात, ज्या उमेदवाराचे खरोखरच मोठे काम आहे. आहोत्र लोकांच्या अडी-अडचणी करिता धावून जातात, अशाच उमेदवारांच्या पाठीशी लोक उभा राहतात. त्यामुळे निश्चितच मयुरी बाळासाहेब मस्के-खेडकर यांचे कार्य उल्लेखनिय आणि दखलयोग्य आहे. म्हणून त्यांचे पारडे जड आहे. गेवराई मतदार संघात, त्यांच्या रुपाने महिला आमदार होण्याचा इतिहास घडणार आहे. गेवराईचे राजकारण निटपणे समजून घेतले अथवा त्यात डोकावून पाहिले तर चित्र स्पष्ट होते की,१९६२ पासून पंडित-पवार यांच्या घरांभोवती सत्ता असल्याचे दिसते. म्हणून एखादाही सामान्य माणूस आजपर्यंत गेवराईचा आमदार का?होऊ शकलेला नाही, असा प्रश्न पडणे सहाजिक आहे. सत्ता स्वतःकडे ठेवण्यासाठी अतिशय कोणत्याही थराचे राजकारण गेवराई होतांना दिसते. त्याविरुद्ध कोणी कडाडून विरोध आणि पहिले बंड केले असेल तर ते म्हणजे बाळासाहेब मस्के यांनी केले. त्यामुळे आजघडीला बहुतांशी लोकांचा वाढत पाठिंबा मनसे उमेदवार मयुरी बाळासाहेब मस्के-खेडकर यांच्या बाजूने दिसतो आहे.

**खंजर बाळगणाऱ्यास**

आली आणि त्यांनी वरील आरोपीला रंगेहात एक मोठा खंजर आणि कमरेला छोटा खंजर असे दोन शस्त्रासह पकडले आहे. त्याच्यावर भारतीय शस्त्र कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील आरोपी याच्यावर इरफान शेख रा. तकीय मशिद या इसमास चाकू दाखऊन १८०० रुपये लुटल्याची घटना या अगोदरच दाखल आहे. नमूद आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदरील कारवाई, श्री. अविनाश बारगळ, अपर पोलीस अधीक्षक बीड श्री सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री. विश्वांबर गोल्डे, बीड आणि पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली सपोनी बाबा राठोड , पोलीस अंमलदार गोवर्धन सोनवणे, तोंडे, जयसिंग वायकर, अश्फाक सय्यद व मनोज परजने यांनी केली आहे.

**गस्त पथकाने एक लाख**

रु. एक लक्ष रक्कम जप्त केल्याचे बीड निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती कविता जाधव यांनी कळवले आहे. एफएसटी (गस्ती) पथक क्र.०७ पथक प्रमुख श्री. लोकरे व त्यांच्या टीमने ही कार्यवाही केली.निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मौजे घाटसावळी, चौसाळा व राजुरी नवगण येथे स्थिरपथक स्थापन करण्यात आलेले आहेत. तसेच ९ एफएसटी (गस्ती) पथके कार्यरत असून सदरील पथकामार्फत दिवसा व रात्री वाहनाची तपासणी करण्यात येत असल्याचेही त्यांनी कळवले आहे.

**जरांगे पाटलांच्या भूमिकेनंतर**

संकल्पना देवेंद्र फडणवीस यांच्या आहेत. अशा हजारो कामांची आखणी करून ही सगळी कामे युती सरकारने पूर्ण केली आहेत. युती सरकारचे मुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीस यांनी या सगळ्या कामांना सुरुवात केली होती.महाराष्ट्र विकासाचे शिल्पकार देवेंद्रजी फडणवीस साहेब हेच आहेत. मराठा आरक्षणावर बोलायचे झाले तर देवेंद्र फडणवीस साहेब यांनीच मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला आरक्षण दिले. आणि उच्च न्यायालयात टिकवले.फडणवीस साहेब यांचे नाव होईल म्हणून महाविकास आघाडी ने जाणीवपूर्वक सर्वोच्च न्यायालयात आरक्षण घालवले.सुप्रीम कोर्टात केस गेली तेव्हा ते मुख्यमंत्री नव्हते..असते तर तिथं ही १००% टिकवून दाखवलं असतं. मराठ्यांना एथड सर्वप्रथम फडणवीस यांनीच दिले.सारथी व आण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करणारे फडणवीसच होते. वसतिगृह, ीिलि वयोमर्यादा वाढ ही फडणवीस साहेब यांचीच मराठ्यांना देण आहे. आता लागू असलेले स्वतंत्र ते एथड असो डएइउ हे १० टक्के मराठा आरक्षण फडणवीस साहेबांनीच दिले आहे. तरीही फडणवीस शिवीगाळ करता ? माझा मराठा इतका अहसान फरामोश कसा झाला? त्या शरद पवार ला विचारा इतकी वर्षे मराठा समाजासाठी काय केले? असा मजकूर भाजपा युवा नेते संभाजी सुर्वे यांनी केलेल्या सोशल मिडियाच्या पोष्टवर आहे.

**ट्रम्पच्या विजयासाठी भारतात**

वचन डोनाल्ड ट्रम्प यांनी दिलं आहे, त्यामुळे अमेरिकेतील हिंदू समूदायाने डोनाल्ड ट्रम्प यांना पाठिंबा दिला पाहिजे, असंही ते म्हणाले.डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे ४५ वे राष्ट्राध्यक्ष होते. २०१७ ते २०२१ पर्यंत त्यांनी अमेरिकेचं राष्ट्राध्यक्षपद सांभाळलं. आता पुन्हा अमेरिकेत निवडणुका लागल्या असून ते निवडणुकीच्या रिंगणात आहेत. ५ नोव्हेंबर २०२४ रोजी अमेरिकेत होणाऱ्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत कोण जिंकणार याची साऱ्या जगाला उत्सुकता लागून राहिली आहे. विद्यमान राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांनी २१ जुलै रोजी अचानक निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतली. उपराष्ट्रपती कमला हॅरिस यांचे नाव राष्ट्रपती पदासाठी त्यांनी पुढे केले. अमेरिकेत राष्ट्राध्यक्ष पदासाठी पक्षाची उमेदवारी लाभणे अत्यंत किचकट असते. अनेक प्राथमिक निवडणुकांतून उमेदवाराला पुढे जावे लागते. प्रत्येक राज्यामध्ये चांगली मते मिळवावी लागतात. पक्षाच्या प्रतिनिधींची मते मिळवावी लागतात. वर्षभराच्या या जटील प्रक्रियेनंतर कोणत्या उमेदवाराला पक्षाची उमेदवारी मिळेल हे ठरते. मागच्या वेळी जो बायडन यांची दमछाक झाली होती. यावेळी तशी मुदतही नव्हती. परंतु एखादा चमत्कार तशी कमला हॅरिस यांना उमेदवारी मिळाली. जो बायडन यांनी कमला हॅरिस यांची उमेदवारी घोषित करताच त्यांना पसंती देण्यास डेमोक्रॅटीक पक्षात चढाओढ सुरू झाली. अवघ्या १५ दिवसांत कमला हॅरिस यांना डेमोक्रॅटीक पक्षाची उमेदवारी लाभली.अमेरिकेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी मतदानाला २४ तासांहून कमी काळ उरला असताना डेमोक्रॅटिक पक्षाच्या उमेदवार आणि विद्यमान उपाध्यक्ष कमला हॅरिस तसेच रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार आणि माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा अखेरच्या टप्प्यातील प्रचार सुरू आहे.

**मनोज जरांगेंची निवडणूकीतून**

मराठा समाजाचे उमेदवार एका जातीवर निवडून येऊ शकत नाही, त्यामुळे एका जातीवर लढणे शक्य नाही, असे सांगत मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभेतून माघार घेत असल्याचे जाहीर केले.मनोज जरांगे पाटील यांनी मागासवर्गीय आणि मुस्लिम समाजासोबत एकत्र निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला होता. यानंतर त्यांनी १४ मतदार संघांमध्ये उमेदवार देणार असल्याची घोषणा केली होती. तसेच काल सकाळी उमेदवारांची घोषणा करु असे त्यांनी म्हटले होते. पण त्यांनी सकाळी निवडणुकीतून माघार घेण्याची घोषणा केली. यावेळी त्यांनी मागासवर्गीय आणि मुस्लिम समाजावर खापर फोडले.

## पान सहा वरून

**जिवलग कार्यकर्त्याची मुंडेंनी**

धर्माधिकारी हेही उपस्थित होते.त्यानंतर पुढील काही मिनिटातच राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या म्बुलन्स मधून शरद कावरे यांना लातूर येथील विवेकानंद रुग्णालयात शिफ्ट करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती स्थिर असून ते लवकरच बरे होतील असा विश्वास डॉक्टरांनी व्यक्त केला आहे. अगदी अज्ञात व्यक्ती नाही अडचणीला मदत करणारे म्हणून धनंजय मुंडे सुपरीचीत आहेत. त्यातच निवडणुकीचा प्रचार सोडून आपल्या जिवलग कार्यकर्त्याच्या मदतीला धावून गेल्याचे वृत्त समजताच धनंजय मुंडे यांच्या कार्यकर्त्यांमध्ये चैतन्याचे वातावरण पाहायला मिळत आहे.

**आरोपींना बुथ केंद्र**

लोकाना बटन दाबवणस भाग पडले, दाबवण्यास नकार दिल्यास त्याचे बटन त्यांनी स्वतः दाबून मतदान केले आहे त्याचा पुरावा लोकसभा निवडणूक २०२४चे बूथ क्र. १३२ आणि १३३ चे रेकॉर्ड पाहिल्यास आपणास दिसून येईल तेव्हा मे. साहेबना नम्र विनंती पूर्वक अर्ज करण्यात आला आहे कि, विधानसभा निवडणूक २०२४ अन्वे होत असलेले परळी मतदार संघ क्र.२३३ मधील बूथ क्र. १४१,१४२, आणि १४३ या बूथवर येतील अट्टलगुन्हेगार ज्यांच्या वर अनेक गंभीर गुन्हे आहेत, चोरी हाफ मर्डर, गुटका तस्करी इत्यादी असून ते जामीन वर बाहेर असून ते मतदान केंद्रावर तेथच उभे राहून मतदारांवर दबाव टाकून बळजबरीने त्यांच्या समर्थक उमेदवारास मतदान करून घेतानाचे प्रकार घडले आहेत. अश्या या व्यक्तीना मतदान केंद्राच्या १०० मीटर परिसर मध्ये मतदान करण्या व्यतरिकीत प्रवेश देण्यात येऊ नये जेणे करून त्या बूथवरील मतदान निपक्ष आणि भयमुक्त मतदान होईल.संबंधित निवडणूक निरिक्षकांनी अर्जाची योग्य दखल घेऊन योग्य कार्यवाही करावी ही विनंती परळी शहर कॉंग्रेसचे शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी केली आहे.

**म्हणून उमेदवारीतून**

असल्याची भूमिका राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी जाहीर केली. सर्वसामान्य जनतेसाठी आणि माझ्यावर प्रेम करणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्याच्या सेवेसाठी मी सदैव तत्पर असेल अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

**परळीत मुंडे विरुद्ध देशमुख**

यांच्यातच थेट होणार आहे. बीड जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघात उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आज संपली यादरम्यान वै ठरलेल्या ३७७ उमेदवारांपैकी २३८ उमेदवारांनी माघार घेतली आहे आता सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये १३९ उमेदवार रिंगणात. **कायम राहिले आहेत:** गेवराई मतदार संघात २१, माजलगाव मतदार संघात ३४, बीड ३१, आष्टी १७, केज २५, परळी ११ याप्रमाणे उमेदवारी अर्ज कायम असून सहा मतदार संघात १३९ उमेदवार आता नशीब आजमावणार आहेत.

**गोरगरिबांना दिवाळीत फराळ**

वाटप करतात. जैतापूर ग्रामपंचायत हद्दीतील बहुतांश भाग हा ऊसतोड मजुरांचा परिसर आहे. या भागातील ऊसतोड मजूर ऊसतोडी ला गेल्यानंतर घरातील वयोवृद्ध निराधार व दिव्यांग नागरिकांना दिवाळीचा फराळ सहसा मिळत नाही याच अनुषंगाने आपण सण साजरा करत असताना आपल्या गाव हद्दीतील ग्रामस्थांनी आनंदापासून वंचित राहू नये याकरिता आम्ही हा उपक्रम राबवत असल्याबाबत छाया भागवत दराडे यांनी माध्यमांना सांगितले. गावातील शालेय विद्यार्थ्यांना फटाके, कपडे, शालेय साहित्य दिवाळीच्या औचित्याने करण्यात येते. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**केजमध्ये निवडणूक वातावरण**

न लढवण्याचा घेतलेला निर्णय कुणाच्या पथ्यावर पडणार हे निकालाअंती स्पष्ट होईल. मात्र संगिता ठोंबरे यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेऊन पृथ्वीराज साठे यांना जाहीर पाठिंबा दिल्याने त्याचा कितपत फायदा साठे यांना होतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. तर सीता बनसोडे यांनी अद्याप आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही .

**सामाजिकतेतून ऋणानुबंध**

प्रामुख्याने महिला पुरुष आणि लहान मुले-मुली बहुसंख्येने उपस्थित होते.यावेळी संघटनेचे अध्यक्ष कडूदास कांबळे यांनी शिक्षणाचे महत्त्व पटवून सांगून शाळेतील मुलांनी दररोज शाळेत गेले पाहिजे तसेच मुला मुलींच्या आई-वडिलांनी आणि पालकांनी मुलांना शिकवण्याचे आवाहन केले. जोपर्यंत आपण शिक्षण घेणार नाही तोपर्यंत आपला गुन्हेगारीचा कलंक जाणार नाही असेही यावेळी त्यांनी सांगितले.संघटना भविष्यात महिलांना वेगवेगळ्या व्यवसायात आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची माहिती दिली. आम्ही आपल्याला शासनाच्या विविध योजना मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू तसेच संस्थात्मक पातळीवर ही मदत करू असेही संस्थेचे अध्यक्ष कडूदास कांबळे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार संघटनेचे गेवराई तालुका अध्यक्ष मनीषा जवंजाळे यांनी मानले.

**नमीता लोखंडेच्या सासऱ्याने**

काच खाली होत नव्हता निवडणूक आली कीच फक्त तुम्हाला जनतेचा पुळका येतोच करा आता प्रत्येकाच्या गाठीभेटी घेतात तसेच पाच वर्षांमध्ये जर लोकांच्या गाठीभेटी घेत लोकांच्या आमदार म्हणून सुखदुः खामध्ये तुम्ही कधी सामील झालात तेही सांगा प्रत्येक वेळी तुमच्या सासऱ्यानी प्रत्येक समाजाच्या लोकांची इज्ञतीची बेईजचत केलेली आहे त्यामुळे ते लोक या निवडणुकीमध्ये तुमची तुम्हाला जागा दाखवल्याशिवाय राहणार नाहीत अशीच चर्चा सध्या केज विधानसभा मतदारसंघांमध्ये होताना दिसत आहे.

**दिंद्रुडमध्ये बहारदार**

गायकवाड, परशुराम कटारे, टाळ वादक कैवल्य कांबळे यांनी एकापेक्षा एक सरस भक्तीगीते व भावगीते सादर केली. सदरील संगीत मैफिलीचे बहारदार सूत्रसंचालन बंडू खांडेकर यांनी केले.

**जपानमध्ये पाहिले लाईव्ह प्रक्षेपण :** आजच्या जमान्यात सोशल मीडिया किती प्रभावशाली आहे, याची प्रचिती आली. सुरमयी दिवाळी पहाट या कार्यक्रमाचे फेसबुक वर लाईव्ह प्रक्षेपण करण्यात आले होते. गाढे पिंपळगाव येथील रहिवासी असलेल्या वैजनाथ आप्पा थोंटे यांच्या कुटुंबीयांनी या कार्यक्रमाचा लाईव्ह आनंद जपान मधील तुतसुंगी शहरात घेतला. ग्रामीण कलावंतांनी सादर केलेला आपल्या मातीतील कार्यक्रम पाहून गावाकडची दिवाळी आठवली अशी भावना थोंटे आप्पा यांनी दूरध्वनी वरून व्यक्त केली. खरंच सोशल मीडियाने जागतिक स्तरावर स्नेहीजणांचे ऋणानुबंध मजबूत केले आहेत. सोबतच नवोदित कलावंतांना त्यांची प्रतिभा सादर करण्यासाठी प्रभावी व्यासपीठ मिळवून दिले आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**

हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स अॅन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi hews paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी


## वेचक

### कामाठीपुरात लाकडाच्या दुकानाला आग

**मुंबई :** कामाठीपुरा परिसरात शुक्रवारी रात्री साडेनऊच्या सुमारास भीषण आग लागली. आगीच्या ठिकाणाजवळ फोडण्यात आलेल्या फटाक्यांमुळे ही आग लागल्याचे सांगण्यात येत आहे. सुदैवाने आगीच्या घटनेत कोणीही जखमी झाले नाही. तथापि, यामुळे मालमत्तेचे नुकसान झाले आणि टिन वापरून उभारलेली अनेक दुकाने जळून खाक झाली. या घटनेमुळे आग लागलेल्या इमारतीजवळ राहणाऱ्या लोकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. एका लाकडाच्या दुकानात आग लागली आणि स्थानिकांनी आग आटोक्यात आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी अग्निशमन दल आणि पोलीसही घटनास्थळी दाखल झाले. अखेर अग्निशमन दलाच्या मदतीने आग आटोक्यात आणण्यात आली.

### 'नीट' परीक्षेचा पॅटर्न बदलणार?



**मुंबई :** उत्तर प्रदेशसह अनेक राज्यांतील पेपर फुटल्याने वादात सापडलेल्या नीट परीक्षेबाबत के. राधाकृष्णन समितीने आपला अहवाल नुकताच सादर केला. समितीने आपला अहवाल सादर करताना अनेक छोट्या-मोठ्या बदलांची शिफारस केली. यामध्ये अनेक टप्प्यांत परीक्षा घेणे, ऑनलाईन परीक्षा घेणे आणि हायब्रीड मॉडेलचा अवलंब या पॅटर्नचा प्रामुख्याने समावेश आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार या समितीची नियुक्ती करण्यात आली होती. नीट ही वैद्यकीय अभ्यासक्रमासाठीची केंद्रीय सामायिक चाचणी परीक्षा आहे. मेडिकलच्या एक लाख ८ हजार जागांसाठी २४ लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती. मात्र यादरम्यान पेपर फुटल्यामुळे मोठे वादंग निर्माण झाले होते. नीट परीक्षेतील गोंधळानंतर सर्वोच्च न्यायालयाने समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले होते. या निर्देशानुसार नियुक्त के. राधाकृष्णन समितीने शिक्षण मंत्रालयाला आपला अहवाल दिला आहे. नीट परीक्षा घेणाऱ्या एनटीएमध्ये कर्मचाऱ्यांची संख्या वाढवण्याची समितीकडून शिफारस करण्यात आली आहे. या प्रकरणात सीबीआयने अनेकांना अटकही केली होती. पेपर फुटल्याने ही परीक्षा पुन्हा घ्यावी, अशी मागणी करण्यात येत होती. पण परीक्षेच्या आयोजनात नियमभंग झाल्याचा कोणताही विश्वासार्ह पुरावा सापडला नाही. त्यामुळे या परीक्षा पुन्हा घेण्याची काही आवश्यकता नाही, असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी दिला होता.

# बेस्ट कर्मचाऱ्यांच्या काम बंद आंदोलनाचा अंशतः परिणाम

९६ टक्के बस गाड्या आगाराबाहेर निघाल्या

◆ **मुंबई (प्रतिनिधी):**



आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी बेस्टच्या काही संघटनांनी काम बंद आंदोलन करण्याचे रविवारी घोषित केले होते. मात्र बेस्ट कर्मचाऱ्यांनी या आंदोलनाकडे पाठ फिरवल्याने रविवारचे काम बंद आंदोलन यशस्वी होऊ शकले नाही. बेस्ट उपक्रमांने दिलेल्या माहितीनुसार काल ९६ टक्के बस गाड्या आगाराबाहेर निघाल्या, तर मागाठणे आगार वगळता इतर कोणत्याही आगारावर परिणाम झाला नसल्याचे सांगण्यात आले.

बेस्ट उपक्रमाच्या कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान म्हणजेच बोनस यावर्षी घोषित होऊ शकला नाही. मुंबई महापालिकेला बोनस घोषित होत असतानाच बेस्ट उपक्रमाच्या कर्मचाऱ्यांनाही बोनस घोषित होईल अशी अपेक्षा होती, मात्र आचारसंहिता लागल्याने बेस्ट कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान घोषित होऊ शकले नाही. त्यामुळे बेस्ट कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड प्रमाणात असंतोष निर्माण झाला आहे. त्यातच बेस्टने सानुग्रह अनुदानाचे पैसे न मागितल्याने त्यांना ते देता आले नाही असे मुंबई महापालिकेने स्पष्ट केले.

बेस्ट उपक्रमामधील कर्मचारी गेले अनेक महिन्यांपासून अनेक समस्यांनी त्रस्त आहेत त्यातच सानुग्रह अनुदान घोषित केल्यामुळे त्यांच्या संतापात भर निर्माण झाली आहे. त्यामुळे काही संघटनांनी भाऊबीजेच्या दिवशी बेस्ट बंदचे आवाहन केले होते. मात्र बेस्ट कर्मचाऱ्यांकडून या आंदोलनाकडे पाठ फिरवण्यात आली.

बेस्ट उपक्रमाने आणि दिलेल्या माहितीनुसार आज १००% पैकी ९६ टक्के बस गाड्या प्रवर्तित करण्यात आल्या तर खासगी कंत्राटदाराच्या ९३ टक्के बस बाहेर पडून बस गाड्या सुरळीतपणे सुरू होता. बेस्टच्या मागठाणे आगारामध्ये सकाळी कर्मचारी गैरहजर राहिले मात्र दुपारपर्यंत सर्व कामावर परतू लागले त्यामुळे विशेष कोणताही परिणाम झाला नाही त्यामुळे संध्याकाळ पर्यंत सर्व कर्मचारी हजर राहिल्याने बेस्टने भाऊबीजेनिमित्त अतिरिक्त बस गाड्या चालवल्या असे बेस्ट उपक्रमाने स्पष्ट केले.

भाजपा प्रवक्ते आमदार नितेश राणे यांची टीका

# उबाठात उमेदवारीची तिकिटे विकतात हे पुन्हा झाले सिद्ध

◆ **कणकवली (प्रतिनिधी):**



उबाठा सेनेच्या उमेदवारीचे तिकीट विकतात हे २००५ मध्ये माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांनी शिवसेना सोडली तेव्हा हे सत्य सांगितले होते. आज २०२४ मध्ये सुद्धा उबाठा सेनेत तेच सुरू आहे. उबाठामध्ये जी बंडखोरी सुरू आहे त्याच कारण मातोश्रीमधून मोठ्या प्रमाणात तिकीट विकली आहेत. जो जास्त मोठी बोली लावेल जो जास्त बॅगा पोहोचवेल त्याला तिकीट दिले जात आहे. उबाठा सेनेचा एक प्रवक्ता रोज सकाळी उठून बंडखोरीबाबत कितीही आव आणत असला तरी प्रामाणिक शिवसैनिकांवर उबाठाच्या खरेदी विक्री व पक्षात सुरू केलेल्या व्यापारीकरणामुळे उबाठा सेनेच्या प्रामाणिक शिवसैनिकांवर अन्याय झाला. तिकीट ऑक्शन करण्याचे प्रकार आजही सुरूच आहे अशी टीका भाजपा प्रवक्ते आमदार नितेश राणे यांनी केली.

राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्वांच्या सुरक्षेसाठी हिंदू धर्मासाठी सर्वांना अंगावर घेतले आहे. हे याला समजणार नाही. कोणी अंगावर आला, तर त्याला शिंगावर घेण्याच काम फडणवीस यांनी केले. त्यामुळे त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारची असल्याने त्यांची सुरक्षा वाढविली आहे. तुझ्या मालकाला मच्छर पण मारायला येणार नाही. त्यामुळे राज्य सरकारने त्याची व त्यांच्या कुटुंबाची सुरक्षा काढून घ्यावी. जिहादी हृदय सम्राट म्हणून उबाठा फिरत आहे. महाविकास आघाडी सरकार, ह्याच्या तारखा आणि उबाठाचा प्रवक्ता हा फार मोठा विनोद झालेला आहे. हा उबाठाचा प्रवक्ता २६ तारखेला सकाळी फडणवीस यांना बुके देताना फोटो काढण्यात असेल. परत महायुतीचे सरकार निवडून द्यायाचे जनतेने ठरवलेले आहे. फडणवीस यांना कोणापासून धोका आहे हे निश्चित कळायला पाहिजे. जिहादी प्रेमी तुझ्या सारखा पाकिस्तानी एजन्ट असलेल्या लोकांकडून धोका आहे. तर आदित्य आणि तेजस ठाकरे ला या प्रवक्त्याकडून मोठा धोका आहे हे उबाठा यांनी लक्षात ठेवले पाहिजे.

उबाठा सुद्धा काँग्रेसचे मुख्यमंत्री होते. म्हणून शिंदे यांना शिवसेना वाचवण्यासाठी निर्णय घ्यावा लागला. निवडणूक आयोग, न्याय व्यवस्था, सरकार उबाठाच्या प्रवक्त्याला मान्य नाही. सर्वच तुला वाईट दिसतात सगळे अर्बन नक्षलचे गुण या प्रवक्त्यामध्ये आहेत. मंत्री उदय सामंत बोलले ते आरोप नाही, तर सत्य आहे. राणे यांच्या नावाची सुपारी ह्याच उबाठाने दिली होती. तशीच एकनाथ शिंदे यांच्यासोबत करत होते. उदय सामंत यांनी केलेले आरोप तपसण्यासाठी उबाठांची नार्को टेस्ट करावी अशी मागणी यावेळी आमदार नितेश राणे यांनी केली.

# टीईटी परीक्षा पुढे ढकला; शिक्षक कर्मचाऱ्यांची मागणी

◆ **मुंबई (प्रतिनिधी ) :**

निवडणूक आयोगामार्फत विधानसभा निवडणुकीसाठी निवडलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण १० नोव्हेंबरला आयोजित केले आहे. शिवाय, नवनियुक्त शिक्षकांचे प्रशिक्षणदेखील ४ ते १० नोव्हेंबरदरम्यान आहे. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे १० नोव्हेंबरला शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या तिन्ही कामांचा ताण शिक्षण विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांवर आहे. त्यामुळे टीईटी परीक्षा पुढे ढकलण्यात यावी, अशी मागणी शिक्षक कर्मचाऱ्यांकडून करण्यात येत आहे.



सध्या जिल्ह्यासह राज्यभरात विधानसभा निवडणुकीच्या आनुषंगाने आचारसंहिता लागू आहे. या काळात जिल्हा परिषद शिक्षण विभाग, जिल्हा प्रशासन, सामाजिक कल्याण विभाग, पोलीस प्रशासन, आरटीओ, शिक्षक कर्मचाऱ्यांना निवडणुकीची वेगवेगळी कामे देण्यात आली आहेत. निवडणूक आयोगातर्फे निवडणुकीचे काम दिलेल्या कर्मचाऱ्यांचे १० नोव्हेंबरला प्रशिक्षण घेतले घेतले जाणार आहे. त्यातच शिक्षक होण्यासाठी महत्त्वाची मानल्या जाणाऱ्या महाराष्ट्र परीक्षा शिक्षक पात्रता परीक्षा १० नोव्हेंबर रोजी घेण्यात येणार आहे. तब्बल दोन वर्षांनंतर होणाऱ्या या परीक्षेसाठी हजारो भावी शिक्षकांनी नोंदणी केली आहे. मात्र जवळपास ९० टक्के शिक्षण विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना निवडणुकीचे काम दिले आहे. उरले-सुरले दिवाळीच्या सुट्टीवर गेले आहेत. अशावेळी टीईटी परीक्षेसाठी केंद्रप्रमुख, सहाय्यक कस्टोडियन, पर्यवेक्षक नेमणुकीसाठी कर्मचारीच राहिलेले नाही. यासह या परीक्षेसाठी सुरक्षेसाठी पोलीस प्रशासन, भरारी पथके देखील लागतात.


मात्र, सगळे निवडणूक कामाला असल्यामुळे परीक्षा घ्यायची कशी, असा प्रश्न जवळपास राज्यभरात निर्माण झाला आहे. त्यामुळे टीईटी परीक्षा पुढे ढकलण्यात यावी, अशी मागणी शिक्षण विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी केली आहे.

# चाळीत आजही सजतात फुलांच्या, रंगांच्या रांगोळ्या

छाया : अरुण पाटील







◆ **मुंबई (प्रतिनिधी):**

मुंबईत चाळी आता पुर्नबांधकामासाठी जात असल्याने, चाळी आता दुर्मिळ होणार आहेत. पण ज्या आहेत तिथे आजही या चाळीतल्या प्रत्येक घरातल्या अंगणात विवीध रंगांनी, फुलांनी सजतात रांगोळ्या. दादर शिवनेरी इमारतीत आजही हे चित्र पाहायला मिळते.

एकेकाळी, मुंबईतल्या बीआयटी, बीडीडी अशा चाळींमध्ये दिवाळी सण हा प्रत्येक घरांमध्ये सजताना पाहायला मिळत असे. इथे वर्षभर होणारे वाद हे दिवाळीच्या दिवसांत प्रत्येक घरात फराळांनी भरलेले ताट फिरते तेव्हा तो गोडवा पुन्हा एकदा निर्माण होतो. दिवाळी हा सण चाळीत प्रत्येक घराच्या अंगणात दिव्यांसह रांगोळीने सजतो. आज चाळींचे पुर्नबांधकामासाठी तयार होत आहेत. अशावेळी दादर येथील शिवनेरी चाळीतली दिवाळी आणि तिथे साकारलेल्या रांगोळ्या प्रत्येकाच्या दारात सजल्या होत्या.

त्यात मुलींवर होणारे अत्याचार, हुंडाबळी यावर साकारलेली आकर्षक रांगोळी पाहायला मिळाली. तर फुलांनी सजलेली रांगोळीही सुरेख होती. विवीध रंगांच्या आणि प्रासंगिक रांगोळ्यांनी चाळीतला सजलेला तो माळा दिव्यांच्या रोषणाईनेही उजळला होता.

# मेगाब्लॉक रद्द असतानाही भावांना बहिणींकडे जाण्यास विलंब

◆ **मुंबई (प्रतिनिधी):**



भाऊबीजनिमित्त मध्य आणि पश्चिम रेल्वेने रविवारी घेण्यात येणारा नियमित मेगाब्लॉक रद्द केला असतानाही भावांना बहिणीकडे पोहोचण्यास विलंब झाल्याचे पाहायला मिळाले. रविवारी भाऊबीज असल्यामुळे रेल्वेने मेगाब्लॉक रद्द केला होता. या दिवशी प्रवासी वाहतुकीची प्रचंड गर्दी होत असते. त्यामुळे प्रवाशांना त्रास होऊ नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आला होता. मात्र रविवारी मेगा ब्लॉक रद्द असल्याने मुंबई आणि उपनगरांतील प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला होता. मात्र भाऊबीजेनिमित्त लाडक्या बहिणींना भेटायला जाणाऱ्या भावांच्या प्रवासात रविवारी वाहतूक कोंडीसह वेळेवर रेल्वेस्थानकावर पोहोचवणारी येणारी बस उशीरा आल्याने पुढचा लोकलचा प्रवास या भावांना अधिक त्रासदायक ठरल्याचे दिसून आले.

विशेष म्हणजे बोरिवली, कांदिवली, गोरेगाव दरम्यान दर दहा मिनीटांनी असणारी बसची सेवा काल मात्र एक-एक तास उशीरा असल्याने लोकलचाही फटका सणानिमित्त बाहेर पडलेल्या अनेक प्रवाशांना सहन करावा लागला. रविवार सुट्टीच्या दिवस असल्याने घराबाहेर पडलेल्या अनेकांना या त्रासाला सामोरे जावे लागले. तर मुंबईत बोरिवली स्थानकापर्यंत असणारी बससेवा एक ते दीड तास उशीराने असल्याने पुढे लोकलाचाही चांगलाच फटका या भावांना सहन करावा लागला.

दरम्यान, मोठ्या संख्येने बाहेर पडलेल्या दुचाकी आणि चारचाकी गाड्या, त्यात रविवार असल्याने पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांच्या गाड्यांची यात भर पडली. एरव्ही अर्धा ते पाऊण तासात पार होणारे अंतर पार करण्यासाठी दीड ते दोन तास लागत होते. त्याचसोबत अंतर्गत रस्तेदेखील वाहनांनी भरून गेले होते.

# शहरातील १० मतदारसंघांवर ८ निरीक्षकांची असणार नजर



**मुंबई (प्रतिनिधी):** शहरातील दहा विधानसभा मतदारसंघांसाठी पाच सर्वसाधारण, निवडणूक खर्चविषयक दोन निरीक्षक आणि एक पोलीस निरीक्षक नियुक्त करण्यात आले असून, हे सर्वजण नामनिर्देशनापासून मतमोजणीपर्यंतच्या निवडणूक प्रक्रियेवर केंद्रीय निवडणूक निरीक्षक म्हणून लक्ष ठेवणार आहेत. यामध्ये धारावी व सायन कोळीवाड्यासाठी सत्यप्रकाश टी. एल. वडाळा व माहिमसाठी हिमांशू गुप्ता, वरळी व शिवडीसाठी समीर वर्मा, भायखळा व मलबार हिलसाठी अंजना एम, मुंबादेवी व कुलाब्यासाठी शिल्पा शिंदे यांची केंद्रीय निवडणूक निरीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सह्याद्री अतिथीगृहावर सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत या अधिकाऱ्यांची नागरिकांना भेट घेता येईल. केंद्रीय खर्च निरीक्षक म्हणून धारावी, सायन कोळीवाडा, वडाळा, माहिम, वरळीसाठी विजय वसंता, तर शिवडी, भायखळा, मलबार हिल, मुंबादेवी, कुलाब्यासाठी अमन प्रित हे काम पाहणार आहेत.

# गँगस्टर 'अनमोल बिश्नोई'चा शोध लागला

## अमेरिकेत असल्याची अधिकाऱ्यांची माहिती

◆ **मुंबई (प्रतिनिधी):**



गँगस्टर 'अनमोल बिश्नोई'चा ठावठिकाणा सापडला असून, बिश्नोई अमेरिकेत असल्याची माहिती अमेरिकन अधिकाऱ्यांनी दिले आहे. मुंबई क्राइम ब्रँचने अधिकृतपणे गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई याचा भाऊ मोस्ट वॉन्टेड गँगस्टर अनमोल बिश्नोई याच्या अमेरिकेतून प्रत्यार्पणाची प्रक्रिया सुरू केली आहे. अनमोल बिश्नोई हा बॉलिवूड अभिनेता सलमान खान याच्या घराबाहेर झालेल्या गोळीबाराच्या घटनेसह संपूर्ण भारतातील इतर अनेक प्रकरणात मुंबई पोलिसांना हवा आहे.

मुंबई पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, अमेरिकेच्या अधिकाऱ्यांनी अनमोल बिश्नोई अमेरिकेत असल्याची माहिती भारतीय अधिकाऱ्यांना दिली. मुंबई क्राइम ब्रँचने अनमोल बिश्नोईचे प्रत्यार्पण करत असल्याची माहिती मुंबई सत्र न्यायालयात दिली आहे. तसेच लवकरच पुढील प्रत्यार्पण प्रक्रियेसाठी फाईल केंद्राकडे पाठवली जाणार आहे. अनमोल बिश्नोईवर भारतात सुमारे १७ गुन्हेगारी खटले आहेत. सलमान खान गोळीबार प्रकरणात त्याचा भाऊ गँगस्टर लॉरेन्स बिश्नोई आणि गोल्डी ब्रार यांच्यासमवेत त्याचा सहभाग असल्याचा आरोप आहे. गेल्या आठवड्यात राष्ट्रीय तपास एजन्सीने अनमोल बिश्नोईच्या नावाचा मोस्ट वॉन्टेड यादीत समावेश केला. त्याच्या अटकेसाठी १० लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले. पोलीस अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, पंजाबी गायक सिद्धू मुसेवाला हत्या प्रकरणी वॉन्टेड असलेला अनमोल बिश्नोईवर हत्या घडवून आणण्यासाठी इम्पोर्टेड शस्त्रे पुरवल्याचा आरोप आहे. १२ ऑक्टोबर रोजी बाबा सिद्दिकीच्या हत्येसाठी बिश्नोई गँगने तुर्की बनावटीचे तिसास पिस्तूल आणि एक ग्लॉक बंदुक पुरवल्याचा आरोप आहे. बिश्नोई हा सिद्दिकी यांच्या हत्या प्रकरणातील एका संशयिताच्या संपर्कात होता.





स्वतंत्र वृत्तपत्र विक्रेता सेवा संघाचे लक्ष्मीपूजन मोठ्या उत्साहात साजरे करण्यात आले. यावेळी बाजीराव सेठ व सर्व सेल्समन, सर्व कंपनीचे अधिकारी तसेच मुंबईची संघर्ष समिती सहभागी झाली होती. वरिष्ठ विक्रेतेही यात सहभागी झाले होते आणि सर्व सीएसएमटी आगार, कुलाबा आगार, चर्चगेट आगार, काळबादेवी आगार, कॅमस्कर्नर आगारातील विक्रेते सहभागी झाले होते, स्वतंत्रचे अभिमन्यू सिंग, रवींद्र सिंग, उदय शिंदे, भोलेंद्र सिंग, अशोक पाठक, प्रिन्स सिंग, राजवंत सिंग यांनी संपूर्ण पूजा यशस्वी करण्यात सहभाग घेतला.

## आज प्रवाशांच्या सोयीसाठी विशेष २२ गाड्या चालवणार

# दिवाळी, छठ पूजेदरम्यान पश्चिम रेल्वेकडून विशेष गाड्या

◆ **मुंबई (प्रतिनिधी):**

दिवाळी, छठ पूजे दरम्यान पश्चिम रेल्वेकडून विशेष गाड्या चालविण्यात येणार. पश्चिम रेल्वेकडून फेस्टिव्हल स्पेशल ट्रेन्स विविध ठिकाणांसाठी चालवण्यात येत आहेत. ज्यामध्ये उत्तर प्रदेश, बिहारसाठी विशेष गाड्यांचाही समावेश आहे. ३ नोव्हेंबर २०२४ रोजी पश्चिम रेल्वेने १८ विशेष गाड्या चालवल्या होत्या आणि ४ नोव्हेंबर २०२४ रोजी देखील प्रवाशांच्या सोयीसाठी २२ विशेष गाड्या चालवल्या जाणार आहेत. प्रवाशांची मागणी पूर्ण करण्यासाठी भारतीय रेल्वे या सणासुदीच्या काळात विशेष गाड्या चालवते. या वर्षी छठ आणि दिवाळीच्या निमित्ताने भारतीय रेल्वेकडून सुमारे ७,५०० विशेष गाड्या चालवल्या जात आहेत.

पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी विनीत अभिषेक यांनी जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, प्रवाशांच्या सोयीसाठी आणि प्रवासाची मागणी पूर्ण करण्यासाठी पश्चिम रेल्वेकडून यावर्षी दिवाळी आणि छठ पूजेदरम्यान सुमारे ३२० विशेष गाड्या चालवल्या जात आहे . छठ पूजेसाठी, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम



बंगाल आणि ओरिसा यासह विविध ठिकाणी विशेष गाड्या चालवल्या जात आहेत. पश्चिम रेल्वेच्या नियमित गाड्यांव्यतिरिक्त या विशेष गाड्या या गंतव्यस्थानांसाठी चालवल्या जात आहेत. उपलब्धता आणि मागणीनुसार नियमित गाड्यांमध्ये अतिरिक्त डबेही जोडले जात आहेत. ३ नोव्हेंबर २०२४ रोजी पश्चिम रेल्वेने १८ विशेष गाड्या चालवल्या होत्या आणि ४ नोव्हेंबर २०२४ रोजी देखील प्रवाशांच्या सोयीसाठी २२ विशेष गाड्या चालवल्या जाणार आहेत.

पश्चिम रेल्वेवरून ४ नोव्हेंबर २०२४ रोजी धावणाऱ्या विशेष गाड्यांचा तपशीलः

मुंबईहून सुटणाऱ्या गाड्याः

१ ट्रेन क्रमांक ०९१४५ मुंबई सेंट्रल - बरौनी स्पेशल मुंबई सेंट्रल येथून १०.३० वाजता सुटेल.

२. गाडी क्रमांक ०९०५१ दादर - भुसावळ विशेष दादरहून ००.०५ वाजता सुटेल.

३. वांद्रे टर्मिनस-गोरखपूर अनारक्षित विशेष गाडी क्रमांक ०५०३० वांद्रे टर्मिनस येथून सकाळी ०७.१० वाजता सुटेल.

४. ट्रेन क्रमांक ०९०५५ वांद्रे टर्मिनस-उधना स्पेशल वांद्रे टर्मिनस येथून ०९.५० वाजता सुटेल.

५. ट्रेन क्रमांक ०९६२२ वांद्रे टर्मिनस-अजमेर स्पेशल वांद्रे टर्मिनस येथून ११.१५ वाजता सुटेल.

सुरत/उधना/वापी/वलसाड येथून सुटणाऱ्या गाड्याः

१. ट्रेन क्रमांक ०९०६९ उधना-कानपूर सेंट्रल स्पेशल उधना येथून ०५.३० वाजता सुटेल.

२. ट्रेन क्रमांक ०९०६५ सुरत-छपरा स्पेशल सुरतहून ०८.३५ वाजता सुटेल.

३. ट्रेन क्रमांक ०९०२५ वलसाड - दानापूर स्पेशल वलसाड येथून ०८.४० वाजता सुटेल.

४. गाडी क्रमांक ०९०३९ उधना - जयनगर अनारक्षित विशेष गाडी उधना येथून १०.१५ वाजता सुटेल.

६. ट्रेन क्रमांक ०९०५६ उधना - वांद्रे टर्मिनस स्पेशल उधना येथून १६.१५ वाजता सुटेल.

७. ट्रेन क्रमांक ०९०३३ उधना - बरौनी स्पेशल उधना येथून २०.३५ वाजता सुटेल.

८. ट्रेन क्रमांक ०९०२१ उधना - भावनगर स्पेशल उधना येथून २२.०५ वाजता सुटेल.

वडोदराहून सुटणाऱ्या गाड्याः

१. ट्रेन क्रमांक ०९१११ वडोदरा-गोरखपूर विशेष गाडी वडोदरा येथून १९.०० वाजता सुटेल.

२. ट्रेन क्रमांक ०९१९१ वडोदरा-जयनगर विशेष ट्रेन वडोदरा येथून २३.३० वाजता सुटेल.

राजकोटहून सुटणाऱ्या गाड्याः

१. ट्रेन क्रमांक ०९५७५ राजकोट-महबूबनगर विशेष राजकोट येथून १३.४५ वाजता सुटेल.

२. ट्रेन क्रमांक ०९५२० ओखा - मदुराई स्पेशल ओखा येथून २२.०० वाजता सुटेल.

३. ट्रेन क्रमांक ०५०४६ राजकोट-लालकुआन स्पेशल राजकोटहून २२.३० वाजता सुटेल.

अहमदाबादहून सुटणाऱ्या गाड्याः

१. ट्रेन क्रमांक ०९४१७ अहमदाबाद – दानापूर स्पेशल अहमदाबादहून ०९.१० वाजता सुटेल.

२. ट्रेन क्रमांक ०४१६८ अहमदाबाद-आग्रा कँट स्पेशल अहमदाबादहून १४.१० वाजता सुटेल.

३. गाडी क्रमांक ०९४२५ साबरमती – हरिद्वार स्पेशल साबरमतीहून १८.४५ वाजता सुटेल.

इंदूर/डॉ. आंबेडकर नगर येथून सुटणाऱ्या गाड्याः

१. ट्रेन क्र.०९३२१ डॉ. आंबेडकर नगर-माता वैष्णोदेवी कटरा स्पेशल डॉ. आंबेडकर नगर येथून १०.३० वाजता निघेल. विनीत यांनी पुढे सांगितले की सुरळीत प्रवास सुनिश्चित करण्यासाठी आणि गाड्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी, सर्व स्तरांवर म्हणजे रेल्वे बोर्ड, विभागीय, विभागीय आणि स्थानक स्तरावर सर्व प्रकारच्या परिस्थितींना तोंड देण्यासाठी विशेष नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. ते पुढे म्हणाले की, विशेष गाड्यांना व्यापक प्रसिद्धी देण्यासाठी आणि लोकांपर्यंत माहितीचा प्रसार सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जात आहेत. प्रवाशांना अतिरिक्त ट्रेन सेवेची माहिती देण्यासाठी नियमित सोशल मीडिया पोस्ट, वर्तमानपत्रातील जाहिराती आणि स्थानकावरील घोषणा देण्यात आल्या आहेत. प्रवाशांना तिकीट तपासणी कर्मचारी, आरपीएफ आणि जीआरपी कर्मचाऱ्यांकडून मार्गदर्शन केले जात आहे.

# मुंबई - अहमदाबाद बुलेट ट्रेन दरम्यान ९ नदींवरील पूल पूर्ण



◆ **मुंबई (प्रतिनिधी):**

अहमदाबाद-मुंबई बुलेट ट्रेन प्रकल्प म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वापी आणि सुरत दरम्यान सर्व नऊ नदी पूल पूर्ण करण्यात आले. गुजरातमधील नवसारी जिल्ह्यातील खरेरा नदीवरील पुलाचे नवीनतम बांधकाम आहे. भारताच्या महत्त्वाकांक्षी हाय-स्पीड रेल्वे कॉरिडॉरसाठी गुजरातमध्ये नियोजित केलेल्या वीस पुलांपैकी खरेरा पूल हा बारावा पूर्ण झालेला नदी पूल आहे. पुलाचे बांधकाम २९ ऑक्टोबर रोजी पूर्ण झाले. हा पूल वापी आणि बिलीमोरा स्थानकांदरम्यान आहे, वापीपासून सुमारे ४५ किलोमीटर आणि बिलीमोरा पासून ६ किलोमीटर अंतरावर आहे आणि कॉरिडॉरमधून वाहणाऱ्या नद्यांच्या अनेक नवीन क्रॉसिंगपैकी एक आहे. वापी-सुरत विभागातील नऊ पूर्ण झालेले पूल खरेरा, कोलक, पार, औरंगा, पूर्णा, मिंधोला, अंबिका, कावेरी आणि वेंगनिया नद्यांवर पसरलेले आहेत, ज्यात वलसाड आणि नवसारीसह अनेक जिल्ह्यांचा समावेश आहे. याशिवाय, या विभागाबाहेरील इतर तीन नदी पूल देखील पूर्ण झाले आहेत. कॉरिडॉर पूर्ण झाल्यानंतर, मुंबई ते अहमदाबाद हे अंतर पारंपरिक रेल्वेच्या सध्याच्या सहा तासांच्या प्रवासापेक्षा सुमारे दोन तासांनी कमी होईल.

### मुंबईतील तरुणाई अडकतेय व्यसनांच्या जाळ्यात

**मुंबई :** मुंबईतील तरुणाई व्यसनांच्या जाळ्यात अडकली असून याबाबत मानसोपचारतज्ज्ञांनी चिंता व्यक्त केली आहे. यामध्ये १८ ते ३० या वयोगटातील तरुणांचा सहभाग सर्वाधिक असल्याने मानसोपचारतज्ज्ञांनी भीती व्यक्त केली आहे. मुंबई महापालिकेच्या वतीने परळ येथील केईएम रुग्णालयातर्फे चालवण्यात येणाऱ्या व्यसनमुक्ती केंद्रात यंदा पहिल्या पाच महिन्यांत नवीन रुग्णांमध्ये १५ ते २० टक्के वाढ झाल्याचे समोर आले आहे. यावर्षी जानेवारी ते मे पर्यंतच्या आकडेवारीवरून असे दिसून येते की, या वयोगटातील ७५ तरुण रुग्णांवर सध्या उपचार सुरू आहेत, ही केंद्रातील सर्वांत मोठी संख्या आहे, तसेच ३१ ते ३५ वर्षे वयोगटातील ४७ रुग्ण, १८ वर्षांखालील नऊ आणि ४६ ते ६० वर्षे वयोगटातील सात रुग्णांवर उपचार सुरू आहेत. रुग्णालय प्रशासनाच्या म्हणण्यानुसार रुग्णालयातील डॉक्टर शाळांमध्ये जाऊन तिथेही समुपदेशन करत आहेत. यासोबतच पालक आणि विद्यार्थ्यांना अमली पदार्थांच्या व्यसनाचे घातक परिणाम आणि उपलब्ध सेवांबाबत जागरूक केले जात आहे.

दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी

**सुविचार**- चांगल्या विचारांनी जीवन बदलते, आणि त्याच विचारांनी यश साध्य होते.

# पुन्हा तेच 'राज'कारण....!

या विधानसभा निवडणुकीनंतर मनसेच्या पाठिंब्यावर भाजपचा मुख्यमंत्री बनेल आणि पुढच्या म्हणजे २०२९च्या निवडणुकीनंतर मुख्यमंत्रिपदी मनसेचा नेता असेल अशी भविष्यवाणी मनसेप्रमुख राज ठाकरेंनी केली आहे. सध्या तरी अधिकृतपणे मनसे महायुतीत नाही. मनसेने राज्यभरात दीडशेच्या जवळपास जागांवर आपले उमेदवार उभे केले आहेत; परंतु आतापर्यंतचा 'ट्रॅक रेकार्ड' आणि सध्याची राजकीय परिस्थिती पाहता मनसेच्या संभाव्य आमदारांची संख्या दोन अंकी असण्याची शक्यता खूपच कमी आहे. असे असतानाही राज ठाकरे मनसेच्या पाठिंब्याने भाजपचा मुख्यमंत्री बनेल असे म्हणत असतील तर त्यामागे काही वेगळे 'राज'कारण तर दडलेले नाही ना, अशी शंका येण्यास बऱ्यापैकी वाव आहे. २०१४च्या लोकसभा निवडणुकीतही राज ठाकरेंनी अशीच तर्कविसंगत भूमिका घेतली होती. त्यावेळी लोकसभा निवडणुकीच्या मैदानात उतरलेल्या मनसेने भाजप-शिवसेना युतीच्या विरोधात उमेदवार उभे केले होते; परंतु आपले उमेदवार निवडून आले तर त्यांचा मोदींना पाठिंबा असेल, असे निवडणुकीच्या आधीच राज ठाकरेंनी घोषित केले होते. आताही तशीच भूमिका त्यांनी घेतल्याचे दिसते. राज्यात अनेक ठिकाणी मनसेचे उमेदवार उभे आहेत. त्या मतदारसंघामध्ये महायुतीचेही उमेदवार आहेत. त्यामुळे मनसेचे उमेदवार कुणाविरूद्ध लढणार आणि कुणाचा पराभव करणार हा प्रश्नच आहे. निवडणुकीनंतर आपला महायुतीला पाठिंबा असेल असे आतापासूनच राज ठाकरे सांगत असतील तर मतदारांनी मनसेच्या उमेदवारांऐवजी थेट महायुतीच्या उमेदवारांना मतदान का करू नये, या प्रश्नाचे राज ठाकरेंकडे काय उत्तर आहे? खरे तर राज ठाकरे महायुतीत सामील होणार हे जवळपास निश्चित मानले जात होते; परंतु कदाचित जागावाटपावरून बोलणी फिसकटली असतील किंवा मनसेने महायुतीत सामील होण्याऐवजी स्वतंत्रपणे लढणे महायुतीसाठी अधिक फायदेशीर ठरेल, असा काही निष्कर्ष महायुती आणि मनसेच्या चाणक्यांनी काढला असेल आणि हीच शक्यता अधिक वाटत आहे. मनसेच्या माध्यमातून ठाकरे गटाच्या मतपेढीला खिंडार पाडण्याची योजना त्यामागे असू शकते, ही योजना यशस्वी झाली तर त्याचा फायदा थेट महायुतीच्या उमेदवारांना मिळेल यात शंका नाही. हेच गणित अमित ठाकरेंच्या मतदारसंघात अंगाशी येऊ पाहत आहे, हे लक्षात आल्यावर राज ठाकरेंनी भाजप नेत्यांशी संपर्क साधला. या मतदारसंघात महायुतीने उमेदवार देऊ नये यासाठी पडद्याआड प्रयत्न झाले; परंतु सदा सरवणकरांना नाराज करणे एकनाथ शिंदेंना जमले नाही. त्यांनी सरवणकरांना उमेदवारी दिली. सदा सरवणकर लढतीत कायम राहिले तर अमित ठाकरेंचे निवडून येणे कठीण आहे, हे लक्षात आल्यावर समेटासाठी अगदी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू झाले आणि त्यानंतरच राज ठाकरेंची भाषा बदलली. आता ते अगदी उघडपणे महायुतीच्या बाजूने बोलत आहेत. फडणविसांनी शिंदेंवर दबाव आणला तर माहिमचा प्रश्न सुटू शकतो, हे लक्षात घेऊनच राज ठाकरेंनी भाजप आणि खास करून फडणवीसांची भलावण सुरू केली. त्यांचे प्रयत्न कदाचित यशस्वी होतीलही; परंतु केवळ एका जागेसाठी राज ठाकरे भाजपच्या आहारी जात असतील तर त्याची मोठी किंमत त्यांना भविष्यात चुकवावी लागू शकते. भूमिकेत सातत्य नसणे हा राज ठाकरेंचा एक मोठा दोष मानता येईल. भाजपसोबत जायचे की भाजपच्या विरोधात राजकारण करायचे या गोंधळातून ते बाहेर पडू शकले नाही. आता पुन्हा एकदा त्यांनी भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतला आहे आणि जर निर्णय घेतलाच असेल तर त्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना तशा स्पष्ट सूचना द्यायला हव्यात. एकीकडे भाजपचा मुख्यमंत्री बनेल, त्याला मनसेचा पाठिंबा असेल असे म्हणायचे आणि दुसरीकडे केवळ कार्यकर्त्यांच्या समाधानासाठी स्वतंत्रपणे निवडणुकीच्या रिंगणात उतरायचे हे राजकारण या आधीही त्यांनी करून पाहिले आहे आणि ते सपशेल अयशस्वी ठरले आहे. त्यामुळे भाजपसोबत जायचेच असेल तर केवळ अमित ठाकरेंसाठी सौदेबाजी करून चालणार नाही. महायुतीत थेट सामील होऊन निवडून येण्याची शक्यता असलेल्या किमान पाच-दहा लोकांसाठी त्यांनी भाजपसोबत बोलणी करावी आणि इतर ठिकाणाहून आपले उमेदवार मागे घ्यावे. महायुतीने बाळा नांदगावकरांच्या विरोधात उमेदवार दिलेला नाहीच, अजून दोन-चार नावे त्यात जोडता येतील, तसे न करता भाजप विरोधात लढणार आणि निवडणुकीनंतर भाजपला पाठिंबा देणार हेच जुने राजकारण त्यांनी पुन्हा एकदा केले तर मनसेचे राजकीय भवितव्यच धोक्यात येऊ शकते.

# अपेक्षित मतपरिवर्तन.....!

शिंदे गटाने उमेदवारी नाकारल्यामुळे प्रचंड अस्वस्थ झालेले, माध्यमांसमोर ढसाढसा रडणारे, अगदी आत्महत्येचे विचार मनात घोळत असल्याचे बोलणारे श्रीनिवास वानगा मध्येच दोन-तीन दिवस अज्ञातवासात गेले होते. अज्ञातवासात जाण्यापूर्वी त्यांनी आपल्या मनातील भडास माध्यमांसमोर काढली. एकनाथ शिंदे अतिशय घातकी माणूस आहे, त्याने माझा घात केला, उद्धव ठाकरे देवमाणूस आहेत, त्यांच्यामुळेच मी आमदार होऊ शकलो, मी शिंदेंसोबत गेलो ही मोठी चूकच झाली वगैरे बरेच काही ते बोलले. त्यानंतर ते कुठेतरी निघून गेले. त्यांच्या कुटुंबियांसह त्यांच्या कार्यकर्त्यांनाही काळजी लागून राहिली. दोन-तीन दिवसानंतर ते परतले आणि परतल्यानंतर पुन्हा एकदा माध्यमांशी बोलताना त्यांनी आपल्याला उमेदवारी मिळावी ही अपेक्षा होती; परंतु शिंदेसोबत असलेल्या काही लोकांनी त्यांची दिशाभूल केली, मुख्यमंत्री शिंदेंचा त्यात काही दोष नाही, आता यापुढे शिंदे साहेब जे सांगतील ते काम मी करेल. पक्ष सोडण्याचा माझा कोणताही विचार नाही. मी माझ्या पक्षासोबत एकनिष्ठ आहे. उद्धव ठाकरे सरकारच्या काळात माझ्या मतदारसंघात काहीच काम झाले नाही, शिंदे साहेबांच्या काळात आपण बाराशे कोटींची कामे केली, वगैरे वक्तव्ये केली. श्रीनिवास वानगा यांचे हे मतपरिवर्तन अपेक्षित होतेच. दोन-तीन दिवसांच्या अज्ञातवासात त्यांचे मतपरिवर्तन घडून आले. या अज्ञातवासात त्यांनी कोणाशी संपर्क केला किंवा त्यांच्याशी कुणी संपर्क केला, हे कळू शकले नाही; परंतु एक मात्र खरे की श्रीनिवास वानगा यांच्याप्रमाणेच राज्यातील अनेक नाराज, बंडखोरांचे या दोन-तीन दिवसात असेच मतपरिवर्तन झाल्याचे पाहायला मिळेल. अशा मतपरिवर्तनासाठी कोणते मार्ग वापरायचे याचा संपूर्ण अभ्यास महायुतीच्या ज्येष्ठ नेत्यांना आहे. त्यामुळेच महायुतीचे नेते अगदी विश्वासाने दोन-चार दिवसात सगळे काही शांत होईल, कुठेही बंडखोरी वगैरे होणार नाही असे म्हणत असावेत. सत्ताधारी पक्षाला बंडखोरी शमविणे तुलनेत सोपे जाते, कारण अशा नाराजांना देण्यासारखे त्यांच्याकडे बरेच काही असते, शिवाय कुणी अधिकच अडवून धरत असेल तर किती प्रकारे त्याला धाक दाखविता येऊ शकतो, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. या धाकाच्या जोरावर दुसऱ्या पक्षातील लोकांना शरण आणले जाऊ शकते तर स्वपक्षियांना सरळ करण्यास असा कितीसा वेळ लागेल?

## लोकनामा

# आता 'बटेंगे तो कटेंगे' म्हणण्याची पाळी...!

भूपेंद्र गणवीर
9834245768
ज्येष्ठ पत्रकार, नागपूर

इतिहास बदला घेतो म्हणतात. त्याची प्रचिती 'बटेंगे तो कटेंगे' घोषणेने आली. काळाने ही स्थिती भाजप-संघावर आणली. २०२४ हे वर्ष अनेक कारणांनी कायम स्मरणात राहील. एकेकाळी पुरोहितशाही होती. तिने या देशावर चातुर्वर्ण्य लादले. मानवी समाजात भेदाभेद आणला. शुद्र, अतिशुद्र, आदिम यांना असंख्य जातींमध्ये विभागले. त्यामागे दुष्ट हेतू होता. फोडा अन् झोडाचे षड्यंत्र होते. त्यात ते यशस्वी झाले. त्याची मोठी किंमत भारताने मोजली. शिक्षण, युद्ध आणि व्यापारात तीन वर्गांची मक्तेदारी होती. उत्पादन व सेवेचे काम शुद्र व अतिशुद्रांकडे होते. मोजकी सेना बाहरी आक्रमणांचा सामना करू शकली नाही. वारंवार भारताला गुलाम व्हावे लागले. पोर्तुगीज आले. मोगल आले. निजाम आले. इंग्रज आले. त्यांनी सोन्याचा धूर निघणाऱ्या भारताला अक्षरशः लुटले. शिक्षणाची मक्तेदारी उच्चवर्णियांकडे होती. तो वर्ग मजेत राहिला. त्यांनी इंग्रज, निजाम, मोगलांच्या दरबारात चाकऱ्या केल्या. संपत्ती जमवली. जेव्हा स्वातंत्र्याची पहाट उगवली, लोकशाही आली. त्यासाठी संविधान आले. तेव्हा काही संघटनांचा असली चेहरा दिसला. देश स्वतंत्र झाला. संविधान बनविण्याची वेळ आली तेव्हा कोणी कसा विरोध केला, त्याचा इतिहास साक्षी आहे. सरकार निवडण्यासाठी मतदार कोणाला बनवावे हा एक विषय आला, तेव्हा लगेच जागले. मतदानाचा अधिकार केवळ सुशिक्षितांना द्या, तसेच किमान पदवीधर अट ठेवा, अशी मागणी केली. ही मागणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि संविधान सभेतील सदस्यांनी फेटाळून लावली. मतदार ठरविताना सुशिक्षित- अशिक्षित, गरीब- श्रीमंत, उच्च- निच, महिला- पुरुष असा भेद केला नाही. प्रत्येकाला एका मताचा अधिकार दिला. भारतीय लोकशाहीतील हा सर्वात मोठा क्रांतिकारी निर्णय होता. त्यामुळे आज प्रत्येक उमेदवाराला गरिबांच्या घरांचे उंबरठे झिजवावे लागतात. हात जोडून मताची याचना करावी लागते. मतदारांच्या हिताच्या योजना आणाव्या लागतात. सरकारने लाडकी बहीण योजना आणली म्हणजे उपकार केले असे नाही. मत हवे म्हणून निवडणुकीच्या तोंडावर ही योजना आणली. मताच्या अधिकारात ही शक्ती आहे. जी दूरदृष्टी असलेल्या संविधानाने दिली. मतासाठी शिक्षणाची अट नाकारली. सोबत शिक्षणाची मक्तेदारी संपविली. शिक्षण सर्वांसाठी खुले केले. देशभर शाळा उघडल्या. हे सांविधानिक पाऊल होते. या कृतीने माणसांना विविध जातींत विभागणाऱ्यांचा डाव उलटला. तेव्हा साक्षरतेचे प्रमाण केवळ १६ टक्के होते. पदवीधर त्यापेक्षा कमी असतील. उच्चभ्रू व श्रीमंत घराण्यातीलच होते. महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण नगण्य होते. मतदार ठरवून लोकशाही हायजॅकचा प्रयत्न होता. तो फसला. आता धार्मिक ध्रुवीकरणाचा डाव आहे. त्यासाठी नवे डाव खेळले जात आहेत.

संविधानाने मनूशाहीवर पहिला हातोडा चालविला. विभागलेल्या जातींना समूहामध्ये बांधण्याचा प्रयत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केला. अनुसूचित जाती समूहात देशभरातील ११०८ जाती आणल्या. त्यात महाराष्ट्रातील ५९ जाती आहेत. अनुसूचित जमातींच्या समूहात ७४४ जाती आहेत. त्यामध्ये महाराष्ट्रातील ४७ जाती आहेत. इतर मागासवर्गीयाच्या (ओबीसी) ५ हजारांवर जाती आहेत. मंडल आयोगाने ३७४३ जातींचा ओबीसी आरक्षणात समावेश केला. त्यामध्ये महाराष्ट्रातील ३४६ जाती आहेत. सुमारे दहा हजारांवर जातींना तीन समूहात आणले. या समूहाच्या माध्यमातून जातीत विभागलेल्यांना शक्ती दिली. त्यांना आवाज दिला. आपल्या हक्कासाठी लढण्याची प्रेरणा दिली. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा, हा संदेश दिला. या समूहांनी संघटित व्हावे. हक्काची लढाई लढावी ही अपेक्षा होती. या समूहांना विभागण्याचे काम पुन्हा भाजप करीत आहे.

या समूहातील प्रत्येक नेता भाषणात ८५ टक्केच्या हक्काची भाषा करतो तेव्हा आवेशात असतो. प्रत्यक्षात कृती त्या विरोधात असते. ही वस्तुस्थिती आहे. मी, मी करणारे नेतेसुद्धा वेगळे नाहीत. एकट्या दलित समाजात पन्नासांवर पक्ष आहेत. प्रत्येक मतदारसंघात त्याचे किमान दहा उमेदवार रिंगणात आहेत. उच्च जाती भाजपमध्ये एकवटल्या आहेत. त्यांचे केवळ एक किंवा दोन प्रतिनिधी निवडणुकीच्या आखाड्यात उतरतात. ते बहुसंख्य मतदारसंघात बहुजन उमेदवार देतात. त्यांच्या मागे आपली शक्ती उभी करतात. ज्यांना उच्च जाती म्हणतो, त्या जातीतील माणसांचा आपल्या पक्षासाठी, आपल्या संघटनांसाठी त्याग असतो. पटले नाही, तर लाख शिव्या देतील. कृती करताना त्याग करतील. त्यांच्याकडे पैसा आहे, माध्यमे आहेत, प्रचाराची साधने आहेत तरी ते संयमी आहेत. आंबेडकरवादी पक्षांकडे पैसा नाही, प्रचाराची साधने नाहीत, माध्यमे नाहीत. थोडे मनुष्यबळ आहे त्याची तीन-तेरात विभागणी आहे. काय बोडखे निवडून येणार? सरसकट बहुतेकांची जमानत जप्त ठरलेली असते. कधी एकटा- दुकटा भाग्यवान निघतो. तरी मुजोरी आहे. गप्पा एकीच्या अन् कृती फाटाफुटीची आहे. आता अलीकडे सहारनपूरमध्ये एक नवा पक्ष स्थापन झाला. त्या चंद्रशेखर रावण यांचा पक्षही महाराष्ट्राच्या राजकारणात उतरला. याशिवाय हवसे, गवसे, नवसे आहेत. अगोदर त्यांचा बंदोबस्त हवा आहे. कोणामागे कोण आहे, कोणाला कुणाची फुस आहे हे लोक जाणून आहेत. ते जमानत जप्त करतात. या जमानत जप्तवाल्यांचे वस्त्यावस्त्यांमध्ये मोठे बॅनर, फलक लावावे लागतील. हे काम सज्जन शक्तीला हाती घ्यावे लागेल. कधी ना कधी हे करावे लागेल; हे होणार नाही. तोपर्यंत 'बटेंगे तो कटेंगे' हे शतप्रतिशत तुम्हाला लागू असेल, हे विसरून चालणार नाही. जे सरळरित्या करणे जोखमीचे असते, तिथे अन्य मार्गाचा वापर करतात. न्यायालयाच्या आडून जातीय उपवर्गीकरण लादले. संधी मिळेल तिथे तुम्हाला विभागणार अन् स्वार्थ आला, की 'बटेंगे तो कटेंगे'चा नारा देणार.

आता हेच बघा- मध्य नागपूरचे अनिस अहमद.. त्यांचे मोठे नाव आहे. विद्यार्थी दशेपासून काँग्रेसमध्ये सक्रिय होते. काँग्रेसने त्यांना पद दिले, प्रतिष्ठा दिली, आमदार केले, मंत्रिपद दिले, शिक्षण संस्था दिल्या, भूखंड दिले. या निवडणुकीत पक्षाने उमेदवारी नाकारली. लगेच ते नाराज झाले. सरळ वंचितसोबत संधान बांधले, उमेदवारी आणली. ती हुकली हा भाग वेगळा. वंचितवाले आपला पक्ष कट्टर आंबेडकरवादी असल्याचा दावा करतात. अहमद हे कोणते आंबेडकरवादी आहेत. सोशल इंजिनीअरिंग ऐनवेळी चालत नाही. त्यासाठी अनेक वर्षांची मशागत लागते. ही मशागत उत्तर प्रदेशात मान्यवर कांशीराम यांनी केली होती. तशी मशागत नसेल, तर कुठून पडणार मतांचा पाऊस..! हे साधे गणित समजून घ्यावे लागेल. पावसाळी छत्र्यांप्रमाणे निवडणुकीत अचानक उतरणाऱ्यांना हे कळणार नाही. बसपा, वंचित, रिपा गट एकत्र येत नाहीत. ते त्याग, समर्पणाची भाषा प्रचारात करतात. 'बटेंगे तो कटेंगे' हे धार्मिक ध्रुवीकरणासाठी आहे. त्यापेक्षा अधिक गटतटांचे राजकारण करून नोकऱ्या, प्रगती व समृद्धीपासून नागवलेल्या, शोषित, पीडित, वंचितांसाठी आहे. वेळीच धडा घ्या. आरक्षणाची वाट लावली. महागाई, बेरोजगारी वाढवली. संविधान व लोकशाही धोक्यात आणली. त्यांना धडा शिकविणार, की प्रलोभनांना बळी ठरणार. ते २३ नोव्हेंबरला कळणार.

## निमित्त

# आदर्श दिवाळी!

संकलक: श्रीमती विभा चौधरी
7620831487

दिवाळी जवळ येताच घर, दुकाने, आस्थापने, आपल्या आजूबाजूचा परिसर, शहर यांची स्वच्छता सुरू होते. जाळे- जळमटे काढून रंगरंगोटी केली जाते. तुटक्या- फुटक्या साहित्याची डागडुजी होते. त्यामुळे स्वच्छता आणि नीटनेटकेपणा यांसोबतच वातावरणातील सकारात्मकता वाढते. त्याचा प्रत्येक जिवाच्या मन आणि बुद्धीवर सकारात्मक परिणाम होतो. मनातील नकारात्मकता दूर होऊन आपल्याला आनंद प्राप्त होतो.

'तमसो मा ज्योतिर्गमय' या श्लोकाचा अर्थः हे भगवंता! आपण मला असत्याकडून सत्याकडे, अंधकारातून प्रकाशाकडे न्यावे, अशी प्रार्थना आहे. प्रत्येक प्राणिमात्राची धडपड प्रकाशाकडे जाण्याची असते. ज्या स्थितीत आहोत त्याच्या पुढील स्थितीत जाण्यासाठी, प्रगती करण्याकडे असते. अर्थात नकारात्मकतेकडून सकारात्मकतेकडे जायचे असते. जीवनात सकारात्मकता शिकवणारा, प्रकाशाकडे वाटचाल करण्यास शिकवणारा सण म्हणजे दिवाळी.

**सत्याच्या विजयाचे प्रतीक!**

प्रभू श्रीरामचंद्र हे १४ वर्षांचा वनवास पूर्ण करून दिवाळीच्या दिवशी अयोध्येत परत आले. प्रभू श्रीरामचंद्रांच्या आगमनाने प्रजेला खूप आनंद झाला. त्यांच्या स्वागतासाठी संपूर्ण अयोध्या नगरीत घरोघरी तुपाचे दिवे लावून आनंद व्यक्त करण्यात आला. प्रभू श्रीराम सत्याचे मूर्तीमंत रूप असल्याने त्यांचा विजय म्हणजे सत्याचाच विजय होता. या विजयाचा उत्सव म्हणून आपण दिवाळी दीपोत्सव, प्रकाशोत्सव म्हणून साजरी करतो.

**सकारात्मकता वाढविणारा सण!**

दिवाळी जवळ येताच घर, दुकाने, आस्थापने, आपल्या आजूबाजूचा परिसर, शहर यांची स्वच्छता सुरू होते. जाळे- जळमटे काढून रंगरंगोटी केली जाते. तुटक्या- फुटक्या साहित्याची डागडुजी होते. त्यामुळे स्वच्छता आणि नीटनेटकेपणा यांसोबतच वातावरणातील सकारात्मकता वाढते. त्याचा प्रत्येक जिवाच्या मन आणि बुद्धीवर सकारात्मक परिणाम होतो. मनातील नकारात्मकता दूर होऊन आपल्याला आनंद प्राप्त होतो.

**गुणवृद्धीसाठी लक्ष्मीपूजन!**

लक्ष्मीपूजन हे अश्विन अमावस्येला संध्याकाळी करतात, तसेच रात्री बारा वाजता अलक्ष्मी निःसारण करतात. शास्त्रानुसार लक्ष्मीपूजनामुळे पूजा करणाऱ्याला लक्ष्मी तत्त्वाचा लाभ होतो. तो टिकवून ठेवण्यासाठी धर्माचरण करणे आवश्यक आहे. अधर्माची कास धरली किंवा कर्तेपणा निर्माण झाला, तर आपण स्थिर राहू शकत नाही. लक्ष्मी चंचल आहे, असे म्हणतात; पण खरेच लक्ष्मी चंचल आहे का? याचे उत्तर नाही असे आहे. ती नेहमीच भगवंताच्या अनुसंधानात स्थिर असते. जेथे अनुसंधान असते, जिथे धर्माचरण असते तिथे लक्ष्मी विराजमान होते. ऐश्वर्य, सौंदर्य, शांती, सत्य, समृद्धी आणि संपत्ती यांची अधिष्ठात्री देवी श्री लक्ष्मी कमलासनावर विराजमान होऊन समुद्रमंथनातून आली. अशा या लक्ष्मीचे वर्षातून केवळ एकदा पूजन करून ती प्रसन्न होईल का? तिला प्रसन्न ठेवायचे असेल, तर कमळ ज्याप्रमाणे चिखलातून बाहेर येते त्याप्रमाणे स्वभाव दोषांचा चिखल दूर सारून धर्माचरण करायला हवे. असे धर्माचरण करीत ईश्वराच्या अनुसंधानात रममाण झाल्यास श्री लक्ष्मी हृदयकमळावर निश्चितच विराजमान होईल, तसेच धन- धान्याच्या रूपात आपल्याजवळ स्थिर होईल. आपल्यातील दुर्गुण घालविण्यासाठी प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे, तेच खऱ्या अर्थाने अलक्ष्मी निःसारण होय.

**सांप्रत काळातील दिवाळीचे बदलते स्वरूप!**

समृद्धीकडे, आनंदाकडे, प्रकाशाकडे नेणारी दिवाळी आहे; परंतु सद्य परिस्थिती बघता दिवाळी म्हणजे देवता, थोरपुरुष यांची चित्रे असणाऱ्या फटाक्याची आतषबाजी, चित्रपटातील गाण्यांनी रंगणारी दिवाळी पहाट, डोळ्यांना त्रासदायक आणि घातक ठरणाऱ्या चिनी दीपमाळा आणि आकाशदिवे यांचा झगमगाट.. या सगळयामुळे दिवाळीचे संपूर्ण स्वरूप बदलून गेले आहे. यामुळे नकारात्मकता वाढत आहे. ज्या लक्ष्मीची घरात पूजा करतो तिचेच फोटो असलेले फटाके फोडून आपण चिंध्या करतो. हे योग्य आहे का? अशाने ती प्रसन्न होईल का? घरात केलेल्या पूजेचा काही परिणाम न होता यातून देवतांचे विडंबन होणार आहे. या विडंबनातून होणारे पातक जर आपल्या कृतीतून घडत असेल, तर ती पूजा फलित होईल का? त्याचप्रमाणे अशा चुकीच्या कृतीमुळे युवा पिढी समोर आपण काय आदर्श ठेवणार? याचा विचार करायला हवा. स्वदेशी आणि पारंपरिक साहित्यापेक्षा झगमगाट आणि इन्स्टंटकडे कल वाढतो आहे. ही परिस्थिती बदलायला हवी. त्यामुळे आपल्याला दिवाळीचा खरा आनंद मिळू शकेल.

आदर्श दिवाळी साजरी करण्याचे ध्येय घेऊ या!

देवता, थोरपुरुष यांच्या फटाक्यांची विक्री होत असल्यास हिंदूंनी एकत्र येऊन त्याविषयी प्रबोधन करायला हवे. आपल्या संपर्कात येणाऱ्या बाल आणि युवकांचे प्रबोधन करायला हवे. दिवाळी पहाटमध्ये होणाऱ्या अशास्त्रीय आणि अश्लील गाण्यांच्या ऐवजी भावभक्ती, तसेच देशप्रेम निर्माण करणाऱ्या गाण्यांसाठी आग्रह धरायला हवा. भावी पिढीचा कौशल्य विकास व्हावा, त्यांच्यात हिंदूधर्म- राष्ट्र-संस्कृती विषयी प्रेम आणि कृतज्ञता भाव निर्माण व्हावा. यासाठी रांगोळी स्पर्धा, किल्ले स्पर्धा, परिसर स्वच्छता आणि सजावट स्पर्धा घ्यायला हव्या. शरीर आणि पर्यावरणावर घातक परिणाम करणारे विदेशी आणि चिनी उत्पादने न घेता स्वदेशी आणि हलाल मुक्त उत्पादने घेऊ या. त्याविषयी स्वतः जागरूक राहून कृती करून इतरांनाही जागृत करायला हवे. अशी आदर्श दिवाळीच आपल्याला

**'असतो मा सद्गमया तमसो मा ज्योतिर्गमय**

मृत्योर्मा अमृतम् गमया' म्हणजे अवास्तवातून वास्तविकतेकडे घेऊन जाण्याची, अंधारातून प्रकाशाकडे घेऊन जाण्याची, मृत्यूपासून अमरत्वाकडे घेऊन जाण्याची वाटचाल करायला शिकवते. त्यातूनच आपले जीवन अमृता समान आनंदी होत असते.

## प्रासंगिक

# मानवतेचा दीप लावू!

श्याम ठाणेदार
9922546295


आपण वर्षभर विविध सण साजरे करतो, त्यात दिवाळी सणाला विशेष महत्त्व आहे, कारण दिवाळी हा असा एकमेव सण आहे जो आपण पाच दिवस साजरा करतो. आपल्या देशातच नाही, तर संपूर्ण जगात दिवाळी उत्साहात साजरी केली जाते म्हणूनच दिवाळीला सणांचा राजा म्हणतात. दिवाळीसारखा उत्साह इतर कोणत्याच सणात नसतो. दिवाळीत लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांच्याच उत्साहाला उधाण येते म्हणूनच गरीब असो वा श्रीमंत, राज महालात राहणारा असो वा झोपडीत राहणारा प्रत्येकजण दिवाळी सण साजरा करतो. लहान मुलांसाठी तर दिवाळी म्हणजे पर्वणीच असते. शाळेला सुट्टी, नवे कपडे, नव्या वस्तू, किल्ला बनवणे, फटाके उडवणे, मिठाई, फराळ, मामाच्या गावाला जाणे, अशा सर्व आवडत्या गोष्टी फक्त दिवाळीत करता येतात. दिवाळी म्हणजे लहान मुलांची चंगळ. केवळ लहान मुलेच नाही, तर भावा-बहिणींचादेखील हा आवडता सण, कारण दिवाळीतच भाऊबीज हा बहीण-भावांचा आवडता सण येतो. सासरी असलेली बहीण भावाला ओवळण्यासाठी दिवाळीत आवर्जून माहेरी येते. दिवाळी हा आबालवृद्धांचा आवडता सण.

दिवाळी सण म्हणजे प्रकाशाचा सण, दिव्यांचा सण. दिवाळीच्या पाच दिवसांच्या काळात आकाशकंदील, पणत्या, रांगोळी, नवी खरेदी, नव्या वस्तू, नवे कपडे, फटाके यांची रेलचेल. आताही या वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारपेठा फुलून गेल्या आहेत. लोकांच्या उत्साहाला उधाण आले आहे. या वर्षी महागाई वाढली असली, तरी दिवाळीचा उत्साह कमी झालेला नाही.

दिवाळी म्हणजे आनंदाचा दीपोत्सव.....!

बाहेर प्रकाशाचे दिवे पेटवायचे आणि हृदयातून ज्ञानाचे दिवे प्रज्वलित करायचे. अंतःकरणात अज्ञानाचा, विषमतेचा, अहंकाराचा अंधार असेल तर तो दूर करायचा. ज्याप्रमाणे आकाशकंदील, पणत्या लावून बाहेरील अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते, तसेच आपल्या अंतःकरणात असलेल्या अवगुणांचा अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते. प्रत्येक मनुष्याने शुभ चिंतन करून, शुभ विचार मनात आणून, शुभ विचार प्रकट करून जीवन प्रगल्भ आणि समृद्ध करावे, हाच संदेश दिवाळी देते.

जीवनातून आसुरी शक्तीचा पराभव करण्यासाठी दैवी शक्तीचा वापर करावा. मानवाची सर्व धडपड जीवनात सुख आणि आनंद मिळवण्यासाठीच चाललेली असते. दुःख भोगल्याशिवाय सुखाची किंमत कळत नाही हे तत्त्वज्ञान सांगण्यासाठी ठीक; मात्र दुःखाची अनुभूती घेण्यास कोणालाही आवडत नाही. मनुष्य स्वभावातील हा स्थायीभाव ओळखूनच भारतीय संस्कृतीत सणांची निर्मिती केलेली असावी. गरीब, कष्टी, दीनदुबळे, वंचित असा मोठा दुःखी वर्ग समाजात आहे. आपल्या घरी दिवाळी साजरी करताना त्यांच्याही घरी आनंदाचा एक दिवा लावावा म्हणजे त्यांच्या चेहऱ्यावरदेखील आनंद पसरेल. साने गुरुजी



म्हणतात त्याप्रमाणे बाहेर अनंत दिवे पाजळून दिवाळी येत नसते. हृदयात प्रेमाच्या, मानवतेच्या पणत्या लावून आनंदाची उधळण करणाऱ्या या सणातून आपल्या जीवनात प्रकाश आणू या! अशी दिवाळी साजरी झाली, तरच खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी झाली असे म्हणता येईल अन्यथा नाही!

चला तर मग दीनदुबळयांचे दुःख वाटून घेऊ, मानवतेचा ओलावा देऊ, त्यांच्या पाठीवर प्रेमाचा हात फिरवू, त्यांच्या जीवनात सौख्य निर्माण करू. आपल्या ताटातील खाणे याला प्रवृत्ती म्हणतात, दुसऱ्याच्या ताटातील ओरबाडणे याला विकृती म्हणतात, तर आपल्या ताटातील दुसऱ्याला देणे याला संस्कृती म्हणतात. चला तर मग आपण या दिवाळीच्या निमित्ताने आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न करू.

दौंड, जि. पुणे

## वाचक विचार मंच

### प्रकाश पोहरे यांचे अभिनंदन!

कोरोना काळात रुग्णांना दिल्या गेलेली कोरोना प्रतिबंधक लस ही प्रतिबंधक लसच नव्हे, उलट त्या लसीचे वाईट परिणामही न भरून निघणारी हानी असल्याचा निर्वाळा अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या निकालाने जनलोकनायक प्रकाश पोहरे यांच्या विचारावर अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात शिक्कामोर्तब झाले आहे. याबद्दल प्रकाश पोहरे यांचे अभिनंदन!

या व्हॅक्सिनच्या धंद्यावर पैसे कमाईची चांदी करणाऱ्यांना जोरदार चपराक बसली आहे. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात रॉबर्ट एफ कॅनेडी यांनी लस उत्पादकांविरुद्धचा खटला जिंकला आहे. आता सर्वोच्च निकालावर अपिल नाही. भारतात मात्र, या लसीचे स्तोम माजविले गेले होते तेव्हा त्याचा विरोध देशातून जनलोकनायक प्रकाश पोहरे यांनीच केला होता, हे येथे उल्लेखनीय. त्यांनी हा जीव घेणारा आजारच नसल्याचे, तसेच वातावरणात असलेल्या सुमारे दोन हजारावर व्हायरसपैकीच एक असल्याचे स्पष्ट केले होते. अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयात पोहरे यांच्या विचारांवर शिक्कामोर्तब झाल्याबद्दल प्रकाश पोहरे यांचे पुनश्च अभिनंदन!

**सां.गो. कामडी**
नवरगाव, जि. चंद्रपूर

### दिवाळीत जादा बसेसची गरज!

दिवाळीची सुट्टी सुरू होत असताना एस. टी. बसेसला तुफान गर्दी आहे. त्यामुळे जादा बसेसची गरज आहे, तसेच लांब पल्ल्याच्या बसेस चांगल्या स्थितीतील असाव्यात. गर्दी पाहून बसेसचे नियोजन व्हावे. बसमध्ये उभे राहून प्रवास करणे सोपे नाही. लहान मुले घेऊन प्रवास करणाऱ्या महिला, वयोवृद्ध व्यक्तींना बसमध्ये जागा मिळावी.

**प्र. मु. काळे**
सातपूर, नाशिक.
मो. नं.: ९२७३०४५७९४

## गुल्लेर

# घ्या कानोला

नरेंद्र इंगळे
9561226572

'झाले काय वैनी कानोले?'
'सारंच झालं..येना फराय कराले.. दिवाई हाय ना.'
'भाऊ कुठी गेले?'
'हरबऱ्याचं पेरनं आहे आज..त्याहिले म्हतलं दिवाई झाल्यावर पेरा..या बुवाले घाई मोठी आहे..'
'बरं उरकतं होते.. टेन्शन राह्यत नाही..'
'घ्या फराय..'
'चिवडा द्या मले..गोड खात नाही मी..'
'एक करंजी घेऊन पाहाना..रातीच भरल्या करंज्या..'
'एकटीनं भरल्या काय?'
'तुमच्या भावानं भरू लागल्या..'
'मस्त झाला चिवडा..माह्या घरचा तं भलकसा वातळ केला..खलबत्यात कुटून खा लागते..'
'काही सांगता तुम्ही.. माह्या बहिनले चिवडा करता येत नाही काय?'
'येते सारं..पन अयदीपना करते..तिले जे आवडते तेच करते..तिले अनारसे आवडतात.. मले चकल्या आवडतात.. अनारसे टिपभर करून ठेवले..'
'मायच्या घरी न्याले केले असतीन..'
'आजून ते राह्यलं..मले म्हने दोन किलो तूप आना.. लाडू करतो..तूप सस्त आहे काय? नऊशे रुपये किलो आहे..लाडू करीन अन् सगळे मायच्या घरी घेऊन जाईन..'
'तिकून आननार नाही काय?'
'तिकून काहीच येत नाही.. वातळ चिवळा येते..ठाऊक आहे मले..मी सासरवाडीले गेलो, की फोळनीचं ताक करतात.. पावसाळ्यात गेलो होतो.. ताक अन् भाकर खाऊ घातली.'
'काही सांगता तुम्ही. जवायाले कोनी ताक-भाकर खाऊ घालत असते काय?'
'तुमची शप्पथ! सासरा म्हने आमाले हेच आवडते.. सासऱ्याच्या घरी म्हैस आहे.. ते लेकाचे ताकच पेतात.'
'घरी म्हैस असून तुपाचा सिरा केला नाही तुमाले?'
'नाही ना.. मलेच नवल आलं. काही लोकाईले घरी सगळं असून खायाचा सवाद नसते.. घरी भाजीपाल्याचा मया असून कयन्याच्या वळ्या जेवनारे लोकं आहेत.'
'घ्या एक कानोला..'
'गोड खात नाही मी.'
'घेना.. माही शप्पथ आहे तुमाले.'
'तुम्ही म्हनता म्हनून एक घेतो.'
'कसा वाटला कानोला..'
'वांधा झाला..'
'आता काय झालं एकाएकी?'
'शुगर हाय मले..'
'दिवाळीत सगळं चालते.. एका कानोल्यानं काही होत नाही.'
'मले आजून गुरुबहीनच्या घरी फरायाले जा लागते..'

## धुमस

### चित्र- विचित्र

म्याऊ म्याऊ करणारे
सशासारखे होते कधीकाळी
आता अचानक कसे
फोडतात डरकाळी?

तिकीट कापताच
शिरजोर झाले
एकेकाळचे निष्ठावंत
आता बंडखोर झाले

पूर्वी आरत्या ओवाळणारा
आज विरोधात बोलतो
कालचा चमच्या आज
काट्यासारखा सलतो

सत्तासुंदरीचा सुखद स्पर्श
हवाहवासा वाटतो बुडाला
म्हणून कालचा निष्ठावंत
बंडखोर बनून भूर्र उडाला

आघाडीत बिघाडी
तिकिटाचे वाद किती?
बंडखोरीमुळे हल्ली
त्रस्त झाली युती

जिकडे बघावं तिकडे
असंच चित्र आहे
कधी नव्हे एवढी हल्ली
परिस्थिती विचित्र आहे

**ॲड. अनंत खेळकर**
अकोला

## संवाद

# दिवाळी सणानिमित्ताने अर्थकारणाला मोठी चालना!

भारतीय संस्कृतीत दिवाळी सणाचे महत्त्व वेगवेगळ्या पद्धतीने कथन केले जात आहे. सभ्य आणि सुसंस्कृत समाजव्यवस्था आणि कुटुंबव्यवस्था टिकवून ठेवण्याचा उद्देश या सणाच्या निमित्ताने साधला जातो.

व्यापारी वर्ग या सणाअगोदर मोठमोठ्या सवलती, डिस्काउंट्स किंवा विक्री वाढविण्यासाठी नवनवे फंडे, युक्त्या-प्रयुक्त्या यांचे आयोजन करून वर्षभरात झालेले नुकसान भरून काढण्याचा प्रयत्न करतात. प्रतिवर्षी तेल, तूप, डाळी, साखर, रवा, बेसन, गूळ इत्यादी पारंपरिक फराळ निर्मितीचे घटक यांची दरवाढ होणे, आता नवे राहिलेले नाही. वर्षातून एकदाच येणाऱ्या सणाचे औचित्य साधून दरवाढ दुर्लक्षित केली जाते. जागतिक पातळीवरील मोबाईल्स, ब्रँडेड कार्स, दुचाक्या, कम्प्युटर्स बनविणाऱ्या कंपन्या दिवाळीपूर्वी आपल्या नव्या उत्पादनांची एवढी जाहिरात करतात, की त्यांना अपेक्षित असलेली त्या उत्पादनांची विक्री सहज साध्य केली जाते. ऑनलाइन बाजारात या वर्षीच्या दसरा- दिवाळीच्या लाटेत ५५ हजार कोटी रुपयांची चांदी विकली गेली. तेवढीच विक्री येत्या काही दिवसांत होण्याची व्यापाऱ्यांची अपेक्षा आहे. इंडियन ऑनलाईन शॉपिंग प्लॅटफॉर्मवर अनेक कंपन्यांनी विविध नावांनी आपल्याकडील घरगुती इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, नवी उपकरणे यांच्या जाहिरातींच्या माध्यमातून लोकांना आकर्षून घेतले असून त्या प्रमाणात आपली विक्री नेहमीपेक्षा २० ते ३० पटीने अधिक वाढविली आहे. पूर्वापार चालत आलेल्या परंपरांनुसार फराळ, फटाके, रोषणाई, कंदील, रांगोळ्या, नवे कपडे यांनी दिवाळी उत्सव साजरा केला जातो. या निमित्ताने लोकांकडून चैनीच्या वस्तू, नवी घरे, नवे वाहन, दागदागिने खरिदले जातात. हे हेरून व्यापारी वर्ग आपल्या व्यवसायाचा उत्कर्ष साधतात. देशातील सर्व प्रकारच्या बाजारपेठांत जी काही खरेदी- विक्री केली जाते त्या अर्थकारणाने समाजकारण देखील प्रभावित होते. आपली सण- उत्सवांची परंपरा समाजाला एकत्रित आणते. त्यांच्या परिणामांनी समाज जोडून ठेवला जात आहे. म्हणूनच सण- उत्सवांची महती, परंपरा वर्षानुवर्षे अशाच प्रकारांनी जपल्या जाईल, याची खात्री वाटते.

**स्नेहा राज**
मुंबई,
मो. नं.: ९९६७०१५८९९

## हॅप्पी बर्थ डे



विजया मेहता – दिग्दर्शिका
तब्बू – अभिनेत्री
मिलिंद सोमण – अभिनेता
उत्तरा केळकर – गायिका
मिलन दर्डा – माध्यम समूह
राकेश नाथ – निर्माता



अद्विक अभिजित मागाडे – ५ वा वाढदिवस

## वेचक

### भाऊबीजेनिमित्त आशा भोसले यांनी आशिष शेलार यांना ओवाळले



**मुंबई :** महाराष्ट्र भूषण व प्रख्यात गायिका आशा भोसले गेली अनेक वर्षे मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार अँड आशिष शेलार यांना भाऊबीज आणि रक्षाबंधनाला राखी बांधतात. आज त्यांनी भाऊबीजेची ओवाळणी करून आशिष शेलार यांना आशीर्वाद दिले. शेलार यांनी या आपल्या दिवाळी पूर्वीच त्यांना एक अनोखी भेट दिली असून वांद्रे पश्चिम रेक्लमेश येथे आशा भोसले यांच्या नावाने "आशा सरगम सागर" असे एक सुंदर गार्डन तयार केले आहे. ज्यामध्ये आशाताईंची छान छायाचित्रे ही लावण्यात आली आहेत. तसेच रोज या बागेत त्यांची मराठी- हिंदी गाणी ही येथे येणाऱ्यांना ऐकण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. निवडणूक जाहीर होण्यापूर्वी आशाताईंच्या हस्ते या गार्डनचे लोकार्पण करण्यात आले होते.

### प्रकाश आंबेडकरांना पुण्यातील रुग्णालयातून डिस्चार्ज

**मुंबई :** वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष अॅड. प्रकाश आंबेडकर यांच्यावर अँजीओग्राफी आणि अँजीओप्लास्टी अशा सर्जरी पुण्यातील



एका रुग्णालयात करण्यात आल्या. त्यानंतर आज त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे, अशी माहिती वंचित बहुजन आघाडीकडून देण्यात आली आहे. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार अँजीओप्लास्टी नंतरची काळजी घेण्यासाठी आणि लवकरात लवकर बरे होण्यासाठी बाळासाहेबांना एका वेलनेस सेंटरमध्ये दाखल करण्यात आले आहे. पुढील ४-५ दिवसांत बाळासाहेब आंबेडकर हे विधानसभा निवडणूक प्रचाराला येणार असल्याचेही वंचित बहुजन आघाडीने म्हटले आहे. गुरुवारी ३१ ऑक्टोबरच्या पहाटे त्यांना छातीत दुखू लागल्याने पुण्यातील एका रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यानंतर त्यांच्यावर अँजीओग्राफी आणि अँजीओप्लास्टी करण्यात आली. ती यशस्वी होऊन आज बाळासाहेब आंबेडकर यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला आहे. बाळासाहेबांना छातीत दुखत होते आणि अस्वस्थ वाटत होते. म्हणून त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. त्यानुसार अँजीओग्राफी करण्यात आली आहे. दरम्यान, वंचित बहुजन आघाडीच्या सोशल मीडिया एक्स अकाऊंटवरून प्रकाश आंबेडकरांच्या तब्येतीबाबत माहिती देण्यात येत होती. त्यानुसार, आता त्यांची प्रकृती उत्तम असून त्यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले आहे. मात्र, ते वेलनेस सेंटरमध्ये राहणार आहेत. 'बाळासाहेब आंबेडकर यांची अँजिओप्लास्टी यशस्वी झाली. बाळासाहेब पुढील २४ तास आयसीयूमध्ये वैद्यकीय तज्ज्ञांच्या निरीक्षणाखाली असतील. तमाम हितचिंतक आणि जनतेने दिलेल्या पाठिंब्याबद्दल आणि संदेशांसाठी सर्वांचे आंबेडकर कुटुंब आभार मानते", असेही वंचितच्या ट्विटर अकाऊंटवरून म्हटले आहे.

### नवाब मलिक यांचे जावई समीर खान यांचे निधन

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांचे जावई समीर खान यांचं निधन झाल्याचं वृत्त समोर आले आहे. काही दिवसांपूर्वीच त्यांचा अपघात झाला होता. यानंतर त्यांच्यावर उपचार सुरू होते. मात्र आता त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळते आहे. याबाबत नवाब मलिक यांनी ट्विट करत माहिती दिली आहे. सप्टेंबर महिन्यात समीर खान यांचा कुर्ल्यात कार अपघात झाला होता. यामध्ये ते गंभीर जखमी झाले होते. नवाब मलिक यांची मुलगी आणि जावई रुग्णालयातून नियमित चेकअपनंतर घरी परतत असताना त्यांचा अपघात झाला होता. जेव्हा ते कारमध्ये बसत होते तेव्हा कारचालकानं चुकून एक्सलेटर दाबला.

त्यानंतर कार एका भिंतीला जाऊन धडकली. या अपघातात समीर खान यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. त्यानंतर त्यांना आयसीयूमध्ये उपचार सुरू होते. मात्र आता त्यांची प्राणज्योत मालवली आहे. ट्विटमध्ये नवाब मलिक म्हणाले की, माझे जावई समीर खान यांचे निधन झाले आहे. अल्लाह त्यांना जन्नतमध्ये सर्वोच्च स्थान देवो. या नुकसानीबद्दल आम्ही शोक व्यक्त करत असल्याने, पुढील दोन दिवसांचे माझे सर्व नियोजित कार्यक्रम पुढे ढकलण्यात आले आहेत. तुम्ही समजून घेतल्याबद्दल धन्यवाद, कृपया त्याला तुमच्या आठवणीत ठेवा. या अपघातासंदर्भात पोलिसांनी थार चालवणाऱ्या ३८ वर्षीय चालक अबुल मोहम्मद अन्सारी याला ताब्यात घेतले होते. त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू होता.

# मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य सेविकांच्या आंदोलनामुळे क्षयरोग लसीकरणाला अडथळा

## राज्यामध्ये दोन महिन्यांत १२ लाखांपेक्षा अधिक नागरिकांचे लसीकरण

◆ मुंबई (प्रतिनिधी ) :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०२५ पर्यंत 'क्षयरोग मुक्त भारत' करण्याचे आवाहन केले आहे. त्यानुसार देशभरामध्ये क्षयरोगा विरोधात व्यापक मोहीम हाती घेण्यात आली असून, राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये १८ वर्षांवरील प्रत्येक नागरिकांना बीसीजी लस देण्यात येत आहे. राज्यात ३ सप्टेंबर २०२४ रोजी सुरू झालेल्या या क्षयरोग विरोधी मोहिमेला राज्यातून चांगला प्रतिसाद मिळत आहे. मागील दोन महिन्यांमध्ये मुंबई वगळता राज्यातील १२ लाख ३० हजार ३६२ नागरिकांना बीसीजी लस देण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये सर्वाधिक २ लाख ७ हजार ७९५ नागरिकांचे लसीकरण करण्यात आले आहे. त्याखालोखाल सांगली ग्रामीण भागामध्ये १ लाख १० हजार ९१९ नागरिक, धुळ्यामध्ये ९० हजार ६५७ आणि पुण्यामध्ये ७० हजार २७७ नागरिकांना बीसीजी लस देण्यात आली आहे.



'क्षयरोग मुक्त भारत' या अभियानांतर्गत राज्यामध्ये सप्टेंबरपासून नागरिकांचे बीसीजी लसीकरण करण्यास सुरूवात झाली आहे. लसीकरण मोहिमेला सुरुवात झाल्यापासून दोन महिन्यांमध्ये राज्यातील १२ लाख ३० हजार ३६२ नागरिकांचे लसीकरण करण्यात आले आहे. मात्र मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य सेविका वारंवार आंदोलन करत असल्याने मुंबईमध्ये लसीकरण मोहिमेला अद्याप सुरुवात झालेली नाही. 'क्षयरोग मुक्त भारत' या अभियानांतर्गत बीसीजी लस देण्यात येणाऱ्या नागरिकांची पुढील तीन वर्षे नियमित तपासणी करण्यात येणार आहे. ज्येष्ठ नागरिक आणि आजारी रुग्णांचा क्षयरोगापासून बचाव करणे आणि लसीचा ज्येष्ठ नागरिकांवर किती परिणाम होतो ते तपासणे हे या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट असल्याची माहिती राज्य क्षयरोग निर्मूलन विभागातील अधिकाऱ्याने दिली.

### मुंबईतील १० लाख नागरिकांच्या लसीकरणाचे उद्दिष्ट

मुंबई महानगरपालिकेच्या २४ प्रभागांमध्ये नागरिकांना बीसीजी लस देण्यात येणार आहे. मात्र मुंबईतील आरोग्य सेविका वारंवार आंदोलन करत असल्याने क्षयरोगाच्या सर्वेक्षणाचे काम अद्याप पूर्ण झालेले नाही. त्यामुळे मुंबईमध्ये लसीकरण मोहिमेला सुरुवात झालेली नाही. मुंबई महानगरपालिकेने १८ वर्षांवरील सहा अति जोखीम असलेल्या गटांची निवड केली आहे. या गटातील १० लाख लोकांचे लसीकरण करण्याचे उद्दिष्ट मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने ठेवले असल्याचे मुंबई महानगरपालिकेतील एका अधिकाऱ्याने सांगितले.



### लसीकरणासाठी वर्गाची निवड

- पाच वर्षांपासून क्षयरोग बाधित
- तीन वर्षांपासून घरातील क्षयरोग रुग्णांच्या संपर्कात
- मधुमेह रुग्ण
- धूम्रपान करणारी व्यक्ती
- कुपोषित व्यक्ती
- ६० वर्षांवरील नागरिक

## सरासरी हवेची गुणवत्ता असमाधानकारक

# फटाक्यांमुळे वाढले मुंबईतील प्रदूषण



◆ मुंबई (प्रतिनिधी) :

दिवाळी सुरू झाली असली तरी त्याच्या तयारीला सगळे बऱ्याच काळापासून लागले होते. सोमवारी २८ ऑक्टोबर रोजी दिवाळीसाठी फटाके घेण्यसाठी लहान मुलांकडुन खुप गर्दी असते. तसेच दिवाळीसाठी फराळ बनवण्यापासून नवीन कपडे खरेदी करण्यापर्यंत सगळ्यांची तयारी चांगलीच सुरू होती. दिवाळी आणि फटाके जणू हे एकच समीकरण आहे. फटाक्यांशिवाय दिवाळी ही अपूर्ण आहे असं अनेकदा लोकांना बोलताना आपण ऐकतो. पण त्यामुळे मुंबईच्या प्रदूषणात किती वाढ झाली आहे याची माहिती समोर आली आहे. मुंबईच्या प्रदूषणात वाढ झाली असून हवेची गुणवत्ता ही १७४ एक्युआय नोंदवण्यात आली आहे, तर हवेची गुणवत्ता जर ७४ एक्युआय असेल, तर हे असमाधान कारक आहे. दरम्यान, आपल्या हृदयासाठी जे महत्त्वाचे आहे ते म्हणजे पीएम २.५ आणि पीएम १० याची गुणवत्ता देखील काही ठिकाणी धोकादायक पातळी म्हणजेच ५०० पर्यंत पोहोचली आहे. मुंबईत गुरुवारी खूप फटाके फोडण्यात आले, त्यामुळेच शुक्रवारी सकाळी मुंबईच्या हवेत धूर दिसून आला. केंद्रिय प्रदूषण नियंत्रन मंडळ (सीपीसीबी) आणि बीएमसीकडून मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईची सरासरी हवेची गुणवत्ता आता असमाधानकारक आहे.

सीपीसीबीने दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी सगळ्यात जास्त हवेची गुणवत्ता ही शिवडीमध्ये नोंदवण्यात आली. तर शिवडीच्या हवेची गुणवत्ता ही ३२९ एक्युआय आहे. त्यानंतर कांदिवलीत २७० एक्युआय, मालाडमध्ये २४४ एक्युआय, भायखळात २२८ एक्युआय, वांद्रे खेरवाडीमध्ये २२४ एक्युआय आणि बोरीवलीत २०४ एक्युआय नोंदवण्यात आले आहे. २०० पेक्षा जास्त एक्युआय आहे. हे सगळे आकडे आरोग्यासाठी घातक आहेत.

### पीएम २.५ आणि पीएम १० ची पातळी वाढली

मुंबईत पीएम २.५ आणि पीएम १० ची धोकादायक पातळी नोंदवण्यात आली आहे. मालाड आणि शिवडीमध्ये पीएम २.५ ची पातळी ही ५०० आणि पीएम १० ची पातळी ही ५०० एक्युआयपर्यंत पोहोचली. कांदिवली पश्चिममध्ये पीएम २.५ ची पातळी ही ४७७ आणि पीएम १० ची पातळी ही ४९१ एक्युआयपर्यंत पोहोचली. बीकेसीमध्ये ३८७ आणि ४१० एक्युआय, चेंबूरमध्ये ४२९ आणि ३५१ एक्युआयची नोंद करण्यात आली आहे.

# जीएसटी विभागाच्या पाच अधिकाऱ्यांवर सीबीआयची कारवाई

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

करविषयक प्रकरणात एका उद्योजकाकडून ५० लाख रुपयांची लाच उकळल्याप्रकरणी वस्तू व सेवाकर विभागाच्या पाच वरिष्ठ अधिकाऱ्यांना सीबीआयने अटक केली आहे. यापैकी दोन अधिकारी भारतीय महसूल सेवेतील आहेत तर उर्वरित अधिकारी जीएसटी विभागात अधीक्षक आहेत. जीएसटी विभागाचे अपर आयुक्त दीपक शर्मा, सहआयुक्त राहुल कुमार, अधीक्षक बिजेंद्र जनावा, निखिल अगरवाल आणि नितीन गुप्ता अशी अटक केलेल्या अधिकाऱ्यांची नावे आहेत. सीबीआयकडून



प्राप्त माहितीनुसार, गोरेगावमधील एका कंपनीचे करविषयक प्रकरण हे अधिकारी हाताळत होते. या प्रकरणाच्या चौकशीदरम्यान या अधिकाऱ्यांनी संबंधित उद्योजकाला अटकेची भीती दाखवत त्याच्याकडे ८० लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली. शेवटी ५० लाख रुपयांवर तडजोड झाली. मात्र, हे पैसे मिळेपर्यंत या अधिकाऱ्यांनी संबंधित उद्योजकाला १८ तास कार्यालयात बसवून ठेवले होते व त्याचा छळ केला, असा त्यांच्यावर आरोप आहे. या उद्योजकाने आपल्या ओळखीच्या माध्यमातून या पैशांची जुळवाजुळव केल्यानंतर त्याला सोडण्यात आल्याचे सूत्रांनी सांगितले. उद्योजकाने लाचखोरीसंदर्भात सीबीआयकडे तक्रार केली. सीबीआयने तक्रारीची पडताळणी केली. महसूल विभागाकडून संमती मिळाल्यानंतर सीबीआयने महसूल सेवेतील अधिकाऱ्यांना अटक केली. त्यानंतर या प्रकरणातील लाचेची ३० लाख रुपयांची रक्कम सीबीआयने जप्त केली आहे.

# कापसाच्या आयातीवर तत्काळ बंदी घालण्याचे मोदींना पत्र

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

कापूस उत्पादनात महाराष्ट्र देशातील दुसऱ्या क्रमांकाचे राज्य असून ४० लाखांपेक्षा जास्त शेतकरी कापसाचे उत्पादन घेतात. राज्यात भरपूर कापूस उत्पादन होत असताना २२ लाख गाठी कापसाची आयात करण्यात आल्याच्या बातम्यांमुळे देशात कापसाच्या भावात मोठी घसरण होण्याची भीती आहे. भारतीय कापूस महामंडळाकडेही विक्री न झालेल्या ११ लाख कापूस गाठी पडून आहेत. शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन केंद्र सरकारने कापसाच्या आयातीवर तत्काळ बंदी घालून भारतीय कापूस महामंडळाला हमीभावाने कापूस खरेदी करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्षनाना पटोले यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून केली आहे.



### देशात कापसाच्या भावात मोठी घसरण होण्याची भीती

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पाठवलेल्या पत्रात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणतात की, सध्या कापसाचे भाव ६५०० ते ६६०० रुपये प्रति क्विंटल असून हा भाव ७१२२ रुपये या हमीभावापेक्षा कमी आहे. बाजारात कापसाला भाव नसल्याने शेतकऱ्यांनी कापूस विकलेला नाही. शेतकऱ्यांकडे कापूस आहे तसेच सीसीआयकडेही कापूस गाठी पडून आहेत. देशात एवढ्या मोठ्या प्रमाणात कापूस असताना कापसाची आयात केल्याने कापूस बाजार कोलमडून त्याचा मोठा फटका शेतकऱ्यांनाच बसेल आणि या निर्णयाचा फायदा फक्त व्यापाऱ्यांना होणार आहे. महाराष्ट्रात कापूस उत्पादक शेतकरी आधीच संकटात आहे, कमी भाव,शेती अवजारांवर १२ ते १८ टक्के जीएसटी आणि अवकाळी पाऊस या दुष्टचक्रात कापूस उत्पादक शेतकरी सापडला असून खराब हवामानामुळे यावेळी १९ लाख हेक्टरील कापूस क्षेत्राचे नुकसान झाले आहे. केंद्र सरकारने जाहीर केलेली नुकसान भरपाईही अद्याप कागदावरच आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजना केवळ विमा कंपन्यांच्या फायद्यासाठी आहे.



दिवाळीच्या काळात भावा-बहिणींना प्रतिक्षा असते ती भाऊबीज सणाची. या दिवशी बहीण भावाला ओवाळते आणि त्याच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करते. चिमुकल्यांची मराठमोळ्या वेषात नवीन कपडे घालून साजरी केली भाऊबीज. **(छायाचित्र : अरूण पाटील)**





मुंबईतील दादर येथे आज लक्ष्मीपूजनाच्या निमित्ताने टोइंग व्हॅनला प्रार्थना करताना आरटीओ पोलीस. **(छायाचित्र अरुण पाटील)**

# म्हाडाच्या लॉटरीत विजेते न ठरलेल्यांना सुद्धा मिळणार मुंबईत घर

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

म्हाडा मुंबई मंडळाने ऑक्टोबर २०२४ साठी २०३० घरांची लॉटरी जारी केली होती. मागील महिन्यातच या घरांची लॉटरी जाहीर झाली होती. या लॉटरीमुळं अनेकांचे मुंबईत घराचे स्वप्न साकार झाले आहे. मात्र, ज्यांना घराची लॉटरी लागली नाही त्यांच्यासाठीही एक आनंदाची बातमी समोर येत आहे. म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या ऑक्टोबर २०२४ मधील २०३० घरांच्या सोडतीतील स्वीकृती पत्र सादर केलेल्या आणि निवासी दाखला प्राप्त झालेल्या घरांच्या विजेत्यांकडून सदनिकेची विक्री किंमत भरून घेण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. ही प्रक्रिया सुरू



असतानाच दुसरीकडे आता मंडळाने परत केलेल्या ४४२ घरांसाठी प्रतीक्षा यादीवरील विजेत्यांना संधी देण्याचा निर्णय घेतला आहे. म्हाडाकडून येत्या काही दिवसातच प्रतीक्षा यादी कार्यान्वित केली जाणार आहे. प्रतीक्षा यादीवरील विजेत्यांसाठी दिवाळीच्या मुहूर्तावर ही आनंदाची बातमी ठरणार आहे. ऐन दिवाळीतच अर्जदारांना घरांची लॉटरी लागणार आहे. मुंबईतील विविध ठिकाणच्या २०३० घरांसाठी ८ ऑक्टोबर रोजी सोडत काढण्यात आली. या सोडतीत २०३० घरांपैकी १३ घरांना शून्य प्रतिसाद मिळाला होता. त्यामुळे ८ ऑक्टोबर रोजी प्रत्यक्षात २०१७ घरांसाठीच सोडत काढण्यात आली. या सोडतीतील विजेत्यांपैकी १५३० विजेत्यांनी घरासाठी स्वीकृती दिली आहे. स्वीकृती दिलेल्यांपैकी ज्यांच्या घरांना निवासी दाखला प्राप्त झाला आहे अशा ३०० हून अधिक विजेत्यांना तात्पुरते देकार पत्र वितरित करण्यात आले आहे. तात्पुरते देकार पत्र प्राप्त विजेत्यांकडून सदनिकेची विक्री किंमत भरून घेण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. जे विजेते सदनिकेची १०० टक्के रक्कम भरतील त्यांना घराचा ताबा देण्यात येणार आहे. ही प्रक्रिया सुरू असतानाच आता परत करण्यात आलेल्या ४४२ घरांसाठी प्रतीक्षा यादीवरील विजेत्यांना संधी देण्यात येणार असल्याची माहिती मुंबई मंडळातील सूत्रांनी दिली.

## ऑक्टोबर महिनाही ठरला सरासरीपेक्षा जास्त उष्ण

# नोव्हेंबरमध्ये थंडी देणार चकवा; मध्य, दक्षिण भारतात पावसाचा अंदाज

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

हिवाळा सुरू झाला असला तरीही नोव्हेंबर महिन्यात राज्यासह देशभरात अपेक्षित थंडी पडण्याची शक्यता नाही. तमिळनाडूच्या किनारपट्टीलगत कमी दाबाचे क्षेत्र तयार होऊन मध्य आणि दक्षिण भारतात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडण्याची शक्यता आहे. प्रशांत महासागरातील ला-निना स्थिती डिसेंबर अखेर सक्रिय होण्याचा अंदाज आहे. हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी शुक्रवारी नोव्हेंबर महिन्याचा अंदाज जाहीर केला. महापात्रा म्हणाले, नोव्हेंबर महिन्यात देशभरात कमाल आणि किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज आहे. सध्या उत्तर भारतात कमाल – किमान तापमान सरासरी दोन ते पाच अंश सेल्सिअसने जास्त आहे. ऑक्टोबर महिन्यात पश्चिमी विक्षोप न आल्यामुळे हिमालयाच्या पायथ्यासह उत्तर भारतातही थंडी नाही. नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात पश्चिमी विक्षोपाचा अंदाज नाही. त्यामुळे उत्तरेत आणि पर्यायाने मध्य महाराष्ट्रात अपेक्षित थंडी पडणार नाही. तापमान सरासरीपेक्षा जास्त राहील. नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात तमिळनाडूच्या किनारपट्टीलगत कमी दाबाचे क्षेत्र तयार होऊन त्याची वाटचाल पूर्व आंध्र प्रदेशच्या दिशेने होण्याची शक्यता आहे. त्यामुळे संपूर्ण दक्षिण भारतासह मध्य प्रदेशपर्यंत ढगाळ वातावरण तयार होण्याचा अंदाज आहे. मध्य प्रदेशपासून खाली संपूर्ण दक्षिण भारतात जोरदार पावसाचा अंदाज आहे. नोव्हेंबर महिन्यात देशात सरासरी ११८.६९ मिलीमीटर पाऊस पडतो, सरासरीच्या तुलनेत १२३ टक्के पावसाचा अंदाज आहे. ढगाळ वातावरणामुळे तापमान वाढ होईल. त्यामुळे नोव्हेंबरमध्ये संपूर्ण भारतात तापमान सरासरीपेक्षा जास्त राहील.



### ला-निना सक्रिय झाल्यास थंडी

डिसेंबरमध्ये ला-निना सक्रिय झाला, तर जानेवारीनंतर देशात थंडीचे प्रमाण वाढू शकते. या काळात पश्चिमी विक्षोप देशाच्या दिशेने येत राहिल्यास अपेक्षित थंडी पडेल. प्रामुख्याने जानेवारी आणि फेब्रुवारी महिन्यात चांगली थंडी पडू शकेल. चांगल्या थंडीसाठी ला-निनासह पश्चिमी विक्षोपांची गरज असते, असेही महापात्रा म्हणाले. लानिनाबाबत जगभरातील सर्वच हवामान संस्थांचे अंदाज चुकले आहेत. आयएमडीच्या दृष्टीने जानेवारी आणि फेब्रुवारी हे दोनच महिने थंडीचे आहेत.

### ऑक्टोबरही सरासरीपेक्षा उष्ण

देशातील कमाल – किमान तापमानाचा ऑक्टोबर महिनाही सरासरीपेक्षा उष्ण ठरला आहे. ऑक्टोबरमध्ये देशात कमाल तापमान सरासरी ३१.७७ अंश सेल्सिअस असते, ते ३१.९९ अंश सेल्सिअस होते. किमान तापमान सरासरी २०.०१ अंश सेल्सिअस असते, ते २१.८५ अंश सेल्सिअस होते. हवामान विभागाकडील १९०१ पासूनच्या आकडेवारीनुसार ऑक्टोबरमधील आजवरच्या सर्वाधिक किमान तापमानाची नोंद झाली आहे.

# मंदिरात नवजात चिमुकलीचे अर्भक सापडले

◆ मुंबई (प्रतिनिधी) :

भाऊबीजेच्या पहाटेच उल्हासनगरातील अंबिका मंदिराच्या बेंचवर नवजात चिमुकलीचे अर्भक टाकून देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. ही माहिती समजताच शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेऊन आणि चिमुकलीला शासकीय रुग्णालयात दाखल करून तिला जीवनदान दिले आहे. ती आता ठणठणीत असून तिचे अंबिका असे नामकरण करण्यात आल्याची माहिती शिवसेनेचे उपशहरप्रमुख, आधार प्रतिष्ठाचे अध्यक्ष संदीप डोंगरे यांनी दिली. उल्हासनगर रेल्वे स्थानकाच्या पूर्वेला प्रसिद्ध अंबिका मंदिर आहे. आज पहाटे साडेपाच वाजण्याच्या सुमारास एका तरुणीला अंबिका मंदिराच्या आवारातून नवजात अर्भकाच्या रडण्याचा आवाज आला. तिने शिवसेनेचे राकेश माने यांना फोन करून कळवले. माने यांनी संदीप डोंगरे यांना माहिती दिल्यावर दोघांनी घटनास्थळी धाव घेतली. मंदिराच्या बेंचवर एका गोणीमध्ये स्त्री जातीच्या चिमुकलीचे नवजात अर्भक होते. तिला बाहेर काढून शासकीय मध्यवर्ती रुग्णालयात नेण्यात आले. तिथे तिच्या बेंबीवरील नाळ कापून तिच्यावर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. मनोहर बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने उपचार करण्यात आले. आता ती ठणठणीत आहे.



# ...मग पत्रकार नेहमीच वंचित का?

## दुःखद प्रेमनाथ कदम,प्रशांत जोशी अन् आता दिलीप बद्दरांचे निधन

परळी/पुण्यभूमीप्रतिनिधी

पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून जनतेचा आवाज शासनापर्यंत पोहोचविण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते. त्यामुळे विविध राजकीय पक्षांचे नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते पत्रकारांचा वापर करतात. शहरातील ज्येष्ठ पत्रकार प्रेमनाथ कदम, प्रशांत जोशी, आणि आता काही दिवसापूर्वी दिलीप बद्दर यांचे निधन झाले. बातम्यांसाठी पत्रकारांकडे धाव घेणारे मात्र जेव्हा पत्रकारांना मदतीची गरज असते तेव्हा मात्र नेहमीच पत्रकार वंचित राहतांना दिसत आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की ,परळी शहरातील गेल्या अनेक वर्षापासून पत्रकारिता करणारे दैनिक मराठवाडा साथीचा महत्त्वाचा भाग सांभाळणारे कार्यकारी संपादक प्रशांत जोशी यांचे एक वर्षापूर्वी निधन झाले होते. त्यांच्या निधनापूर्वी दैनिक अभिमानाचे पत्रकार प्रेमनाथ कदम यांचे तर काही दिवसापूर्वीच दैनिक लोकाशाचे पत्रकार व पत्रकारिता क्षेत्रात सुमारे ३० वर्षे सेवा देणारे दिलीप बद्दर यांचे दुःखद निधन झाले. यामुळे परळी शहरातील पत्रकारितेत मोठी पोकळी निर्माण झाल्याचे दिसत आहे. शहरातील पत्रकारांनी नेहमीच विविध पक्षांचे राजकीय नेते ,पदाधिकारी,



कार्यकर्ते, सामाजिक संघटना सामाजिक कार्यकर्ते यांना सदैव प्रसिद्धी देण्याचे कार्य केलेले आहे. बातम्या देण्यासाठी शहरातील सर्व पत्रकारांचा सर्वच राजकीय पक्षांनी नेहमीच वापर केलेला आहे. सर्वच पत्रकार बांधवांनी सुद्धा बातम्यांना प्रसिद्धी देऊन सहकार्य केलेले आहे. परंतु परळी सारख्या ग्रामीण भागात पत्रकारिता करत असताना कोणत्याही पत्रकारांना ठराविक असे मानधन अथवा पगार मिळत नसतो. जे काही मिळते ते जाहिरातीच्या माध्यमातून आणि जाहिरातीतून मिळणाऱ्या कमिशनच्या माध्यमातून मिळत असते. पत्रकारिता तसे बघायला गेले तर कधीही स्थिर क्षेत्र म्हणून बघता येणार नाही. अस्थिर अशा पत्रकारितेत पत्रकार काम करत आहेत. शहरातील पत्रकार प्रेमनाथ कदम ,पत्रकार प्रशांत जोशी, पत्रकार दिलीप बद्दर यांचे निधन झाले. परंतु त्यांच्या कुटुंबीयांना शहरातील कोणत्याही राजकीय पक्षांच्या नेत्यांनी कोणत्याही प्रकारचे सहकार्य केल्याचे दिसून येत नाही. मध्यंतरी दैनिक पार्श्वभूमीचे पत्रकार रामप्रसाद शर्मा यांचा मुलगा दोन्ही किडन्या खराब झाल्यामुळे मृत्यूच्या दाढेतून बाहेर आला.शहरासाठी काम करणाऱ्या पत्रकारांना शहरातील विविध राजकीय पक्षांचे नेते सामाजिक संघटना कार्यकर्ते यांच्याकडून सुद्धा थोडी बहुत मदतीची गरज असते. परंतु ती गरज पूर्ण होताना मात्र दिसत नाही हे कटू सत्य आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणणारा शहरातील पत्रकार मदतीपासून आणि सहकार्यापासून नेहमीच उपेक्षित दिसत आहे.

# जिवलग कार्यकर्त्याची मुंडेंनी घेतली भेट

## ऋणानुबंध:शरद कावरेंना उपचारार्थ लातूरला केले शिफ्ट



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

मेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आणि त्यातच प्रचाराची धामधूम असताना स्वतः उमेदवार असलेल्या धनंजय मुंडे यांना आपला जिवलग कार्यकर्ता शरद कावरे एका आजारामुळे रुग्णालयात दाखल असल्याचे कळताच प्रचार सोडून धनंजय मुंडे यांनी थेट रुग्णालय गाठून आपल्या जिवलग सहकाऱ्याची भेट घेऊन चौकशी करून पुढील उपचारासाठी त्यांना लातूर येथे पाठवण्याची सोय करून दिली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी तसेच धनंजय मुंडे यांचे जिवलग सहकारी असलेले शरद कावरे यांना थायरॉईड व युरीन इन्फेक्शन मुळे अचानक त्रास होऊ लागल्याने आज कुटुंबीयांनी परळीतील डॉ. वैभव डुबे यांच्या दवाखान्यात ऍडमिट केले होते.

याबाबत माहिती मिळताच धनंजय मुंडे थेट डॉक्टर डुबे यांच्या रुग्णालयात पोहोचले. आपल्या नेत्याला अडचणीच्या काळात धावून आलेले पाहून शरद कावरे यांना रडू कोसळले. यावेळी धनंजय मुंडे यांनी शरद कावरे यांच्या पाठीवर थाप मारत त्यांना धीर दिला. 'शरद तुला लगेच लातूरला शिफ्ट करतो, काळजी करू नकोस, दोन दिवसात बरा होऊन परत येशील' असा विश्वास धनंजय मुंडे यांनी शरद कावरे यांना व त्यांच्या कुटुंबीयांना दिला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष बाजीराव भैया

पान २ वर...

# आरोपींना बुथ केंद्र परिसरात प्रतिबंद करा

## बहादूरभाई:निवडणूक निरीक्षकांना निवेदन

परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

नुकत्याच संपन्न झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत वेगवेगळ्या गंभीर केसेस मध्ये जामीनावर व तडीपार असणाऱ्या आरोपी कडुन मतदान केंद्रात मतदान करतांना दबाव, धमकी, बोगस मतदान करण्यासाठी केलेल्या प्रयत्नाच्या तक्रारी मतदार व्यक्त करत असल्याची माहिती समोर आहेत. विधानसभा निवडणुकीत असेच काही प्रकार घडु शकतात म्हणून या सर्व गंभीर गुन्हात जामीनावर व तडीपार म्हणून बाहेर असलेल्या व्यक्तीना मतदान केंद्र परिसरच्या



१०० मीटर च्या आत येण्यास प्रतिबंद करावा अशी मागणी परळी शहर काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी निवडणूक निरीक्षक सुनील अंचिपका यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुर भाई यांनी वतिने दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे कि, विधानसभा निवडणूक २०२४ अन्वे परळी विधानसभा क्र २३३ हे अती संवेदनशील असून मागील लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये काही मतदान केंद्रावर गंभीर व अट्टल गुन्हेगार जे जामीन वर बाहेर आहेत त्यांनी बूथवर स्वतः बसून राहून लोकाना मतदान त्यांच्या महणण्या नुसार

पान २ वर...

# म्हणून उमेदवारीतून माघार

## राजेभाऊ फड: पक्षाचे काम निष्ठेने करण्याची भूमिका

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

परळी वैजनाथ विधानसभा मतदारसंघात पक्षाच्या मतात फूट पडून पक्षाचे नुकसान होऊ नये यासाठी मी माघार घेत असून, आगामी काळात तेवढ्याच ताकदीने पक्षाचा कार्यकर्ता म्हणून मी काम करणार असल्याचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी सांगितले. सोमवारी त्यांनी आपला अपक्ष भरलेला उमेदवारी अर्ज त्यांनी मागे घेऊन पक्षाचे काम निष्ठेने करणार असल्याची भूमिका त्यांनी जाहीर केली.

मी शरदचंद्र पवार साहेब आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा निष्ठावंत कार्यकर्ता आहे. पक्षाला मी उमेदवारी देण्याची मागणी केली होती. लोकशाहीत मागणी करण्याचा अधिकार हा सर्वांनाच असतो. मात्र



पक्षाचा विचार आणि पक्षाचे धोरण स्वीकारणे आणि त्याचे पालन करणे हे प्रत्येक कार्यकर्त्यांचे कर्तव्य आहे. पक्षाच्या मतात विभाजन होऊ नये आणि नुकसान होऊ नये यासाठी मी माघार घेत असून, आगामी काळात पक्षाचे काम मी त्याच ताकदीने करणार

पान २ वर...

# परळीत मुंडे विरुद्ध देशमुख थेट लढत

## रणधुमाळी: राजेभाऊ फड यांची माघार!

परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी

संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागलेल्या परळी विधानसभा मतदार संघात आज अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी केवळ अकरा उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात राहिले आहेत. यामध्ये प्रमुख लढत ही धनंजय मुंडे विरुद्ध राजेसाहेब देशमुख अशी थेट लढत होणार हे आता स्पष्ट झाले आहे.

बीड जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघापैकी सर्वाधिक लक्ष लागून राहिलेल्या परळी विधानसभा मतदारसंघातून एकूण उमेदवारी अर्जापैकी केवळ अकरा अर्जाच शिल्लक राहिले आहेत. प्रबळ दावेदार प्रतिस्पर्धी उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले आहेत. त्यामुळे परळी विधानसभा मतदारसंघाची लढत ही राष्ट्रवादी



### रिंगणात राहिलेले अकरा उमेदवार

धनंजय पंडितराव मुंडे राष्ट्रवादी,राजेसाहेब देशमुख राष्ट्रवादी शरद पवार गट, धोंडीराम उजगरे बसपा,केदारनाथ जाधव पीजेन्टस् ॲन्ड वर्कर्स पार्टी ऑफ इंडिया,भागवत वैद्य विकास इंडिया पार्टी, साहस आदोडे मराठवाडा मुक्ती मोर्चा,अल्ताफ खाजामिया सय्यद अपक्ष,दयानंद लांडगे अपक्ष, राजेसाहेब देशमुख अपक्ष, शाकीर अहमद शेख, अपक्ष, हिदायत सादेकअली सय्यद अपक्ष असे उमेदवार निवडणूक रिंगणात उभा आहेत.

काँग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार धनंजय मुंडे विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राजेसाहेब देशमुख

पान २ वर...

# गोरगरिबांना दिवाळीत फराळ वाटप

## ऋणानुबंध: जैतापूर सरपंचाचा उपक्रम



पुण्यभूमी/दिंद्रुड प्रतिनिधी :

धारूर तालुक्यातील जैतापुर येथील सरपंचांनी ग्रामपंचायत हद्दीतील गोरगरिबांसोबत दिवाळी फराळ वाटप करत दिवाळी साजरी केली. गेल्या पाच वर्षांपासून करत असलेल्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

येथील सरपंच छाया भागवत दराडे या गेल्या पाच वर्षांपासून जैतापूर ग्रामपंचायत हद्दीतील जैतापूर,देवठाणा, शेरी तांडा,सजगनी तांडा, नागझरी तांडा या भागातील गोरगरीब, निराधार व दिव्यांग ग्रामस्थांना प्रतिवर्षी दिवाळीच्या औचित्याने दिवाळी फराळ

पान २ वर...

# केजमध्ये निवडणूक वातावरण तापले!

## पडघम:संगिता ठोंबरेसह १७ उमेदवारांची माघार!

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज विधानसभा मतदारसंघांमध्ये अनेक नाट्यमय घडामोडीनंतर आज उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी ४३ पैकी सतरा उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आल्याने आता निवडणुकीच्या रिंगणामध्ये २६ उमेदवार राहिले आहेत. केज विधानसभा मतदारसंघाची निवडणूक ही आता स्पष्ट उमेदवारांच्या यादीत आली आहे. केज विधानसभा मतदारसंघासाठी एकूण ,४७ उमेदवारी अर्ज दाखल झाले होते. मात्र यामध्ये चार अर्ज अवैध ठरल्याने ४३ उमेदवारी अर्ज उर्वरित होते. परंतु उर्वरित ४३ पैकी १७ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज माघारी घेतल्याने आता केवळ २६ उमेदवार रिंगणात आहेत. यामध्ये माजी आमदार संगीता ठोंबरे, नगराध्यक्ष सीता बनसोड यांच्यासह




अन्य काही उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतले आहेत. दरम्यान, उमेदवारी अर्ज मागे घेतल्यानंतर आता जे २६ उमेदवार रिंगणात आहे त्यामध्ये भाजपच्या नमिता मुंदडा, राशपचे पृथ्वीराज साठे, मनसेचे रमेश गालफाडे हे प्रमुख उमेदवार निवडणूक लढवत आहेत. आणि आता लढतही तिरंगी होण्याचे स्पष्ट झाले आहे. यामध्ये कोण बाजी मारणार ? मनोज जरांगे पाटील यांनी निवडणूक

पान २ वर...

# सामाजिकतेतून ऋणानुबंध जोपासले

## माणूसकी: पारधी वस्तीवर दिवाळी साजरी



गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील आंबुनाईक तांडा येथील पारधी वस्तीवर आझाद क्रांती कामगार युनियन संघटनेने पारधी वस्तीवरील सर्व कुटुंबांना दिवाळीच्या फराळाचे वाटप केले तसेच यावेळी महिला आणि लहान मुला मुलींसोबत दिवाळीच्या फराळाचा आस्वाद घेतला. आझाद क्रांती कामगार युनियनचे कार्यकर्ते मागील १३ वर्षापासून अशा पद्धतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करत आले आहेत.

या कार्यक्रमासाठी आझाद क्रांती कामगार युनियनचे प्रदेशाध्यक्ष कडूदास कांबळे, प्रदेश उपाध्यक्ष मंगलताई राठोड, प्रदेश सचिव कविताताई डोंगरे, गेवराई तालुका अध्यक्ष मनीषा जवंजाळे, गेवराई तालुका संघटक सुशीला खरात, पत्रकार लक्ष्मण उमाप पारधी समाजाचे कार्यकर्ते संतोष भोसले, नुरकास बिर्याणी यांच्यासह

पान २ वर...

## संस्कृती सूरमयी गीतांनी दिवाळीच्या पहाटेत गोडवा

# दिंद्रुडमध्ये बहारदार सुरांची मैफल

दिंद्रुड/पुण्यभूमी प्रतिनिधी

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी प्रकाशाचा सण असलेल्या दिवाळीनिमित्त दिंद्रुड येथे बहारदार सुरांची मैफिल रंगली. तब्बल तीन तास चाललेल्या सुरमयी पहाट या कार्यक्रमाने दीपावलीचा गोडवा आणखी वाढवला. आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे प्रमुख देवदूत डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमास संगीतातील रसिक व दर्दी मंडळी आवर्जून उपस्थित होते. संगीत विशारद गणेश कांबळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सूरबद्ध केलेला हा कार्यक्रम उपस्थितांना वेगळ्या विश्वात घेऊन गेला.

दिवाळी किंवा दीपावली हा प्रकाशाचा हिंदू सण आहे, जो संपूर्ण भारत वर्षात साजरा केला जातो. अंधारावर प्रकाशाचा, वाईटावर चांगल्याचा आणि अज्ञानावर



ज्ञानाच्या विजयाचे प्रतीक म्हणून या सणाला ओळखतात. दिवाळी सण मोठा नाही आनंदाला तोटा असं म्हटलं जातं. आणि या आनंदाला आणखी उधान यावं यासाठी मागच्या काही वर्षांपासून देवदूत डॉ. ओमप्रकाश शेटे व सौ शिल्पाताई शेटे हे दोघे दांपत्य सुरमई पहाट हा गीतांचा बहारदार कार्यक्रम आयोजित करतात.

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे 'ओम साई शिल्प' निवासस्थानी झालेल्या या संगीत मैफिलीत ओंकार स्वरूपा सद्गुरु समर्था, पांडुरंग नामी लागला असे ध्यास, अवघे गरजे पंढरपुर, विसरू नको श्रीरामा मला, आकाशी झेप घे रे पाखरा, शोधीशी मानवा राउळी मंदिरी, पहाटे पहाटे मला जाग आली, दिस जातील दिस येतील, कसं सांगू राणी मला गाव सुटाना, प्रीतीच झुळझुळ पाणी, अष्टविनायक, भैरवी यासारखी लोकप्रिय व गाजलेली गीते सादर करून प्रस्तुत कलावंतांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले. आता तरी देवा मला पावशील का? हे दहा वर्षाच्या छोट्या कैवल्य गणेश कांबळे याने सादर केलेल्या गीताला प्रेक्षकांची वाहवा मिळाली.

श्री गुरुदेव संगीत ग्रुपचे संचालक तथा संगीत विशारद गणेश कांबळे यांच्या कुशल मार्गदर्शनात तबला वादक संकेत जोशी, पखवाज वादक चैतन्य मंत्री, गायिका डॉ. निवेदिता कटारे, सिंथेसाईजर दीपक मोटे, गायक चंद्रकांत

पान २ वर...

# नमीता लोखंडेच्या सासऱ्याने मराठ्याची जात काढली?

## सवाल:मराठा समाजाने तुम्हाला मतदान का करावे

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

मराठा आरक्षणाचा मुद्दा पेटलेला असताना सत्ताधारी आमदार नमिता मुंदडा यांचे सासरे नंदकिशोर मुंदडा यांनी उंदरी गाव मध्ये मराठ्यांची जात काढली एकीकडे सासऱ्याने जात काढली होती आणि आता दुसरीकडे सुनेने मराठा समाजाला मतदान मागायचं असं कसं चालणार मराठा आरक्षणाला पाठिंबा तर सोडाच पण तुम्ही त्यांची जात पण काढली आणि आता त्यांच्याच गावामध्ये तुम्ही मला मतदान करा म्हणून हात जोडता आमदार नमिता मुंदडा तुमचे सासरे प्रत्येकालाच



म्हणतात तुझं बघून घेतो तर मग या विधानसभेच्या निवडणुकीला तुम्हाला त्या लोकांनी मतदान तरी कसे करायचे असा प्रश्नच उपस्थित होताना दिसत आहे तुमच्या सासऱ्याची मतदारसंघांमध्ये वाढलेले अरेरावी या निवडणुकीमध्ये याचा परिणाम तुम्हाला नक्कीच भोगावा लागेल अशी पण चर्चा केज विधानसभा मतदारसंघात होताना दिसत आहे सध्या तरी केज विधानसभा मतदारसंघातील लोकांमध्ये चर्चा आहे की मुंदडा नको बाकी कोणीही चालेल तुमच्या आमदारकीच्या पाच वर्षाच्या काळामध्ये तुम्हाला गाडीतून खाली उतरायचं म्हणलं की जीवावर येत होतं तुमच्या गाडीचा जनतेसाठी काळा

पान २ वर...